MAHMARI 19358/13/1/2000-TC

प्रज्वलितो ज्ञानमयः प्रदीपः
विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष सोळावे / अंक ९ / सप्टेंबर २०१५

## संपादकीय

### येरे येरे पावसा ...

'येरे येरे पावसा, तुला देतो पैसा, पैसा झाला खोटा, पाऊस आला मोठा'. यमकापलीकडे या ओळींना काही फारसा अर्थ आहे असे वाटत नाही. बाल गोपाळांनी पावसामध्ये भिजण्याचा आनंद लुटावा, म्हणूनच या गीताचे प्रयोजन केले गेले असावे.

आपल्याकडील शिक्षण धोरणाचेही असेच काहीसे आहे. राजकीय सत्ता बदल झाला किंवा मंत्रीबदल झाला, की नवीन-नवीन शिक्षण धोरणांचा पाऊस पडायला लागतो. ही सगळी धोरणं बहुधा चार भिंतींमधील शिक्षणाच्या संदर्भातच असतात. शिक्षण म्हणजे नोकरी. विशेषतः सरकारी नोकरी मिळवण्याकरता लागणारा परवाना, या पलीकडे 'शिक्षणा'ला शिक्षण धोरणांमध्ये फारसा अर्थ नसतो. मध्ये मध्ये तोंडी लावायला 'संशोधन' वगैरे शब्दांची पेरणी केलेली असते. ८ वीपर्यंत परीक्षा नाही आणि पुढे पास होईपर्यंत परीक्षा, ही क्रांतीकारण धोरणे सध्या आपले शिक्षणमंत्री राबवित आहेत. प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाला 'अधिकार' आणि 'आरक्षणा'मध्ये बांधून ठेवल्यावर एक मोठी शैक्षणिक क्रांती आपण सध्या पूर्ण केली आहे.

शिक्षण हे व्यक्तीला संघर्षाच्यावेळी किंवा स्पर्धेमध्ये योग्य निर्णय घ्यायला शिकवते, किंवा घडणाऱ्या प्रत्येक गोष्टीची कारण मीमांसा करण्याकरता उद्युक्त करते. तसेच, नागरी व्यवस्था संतुलित ठेवण्याकरता लागणारी नियंत्रणे स्वच्छेने स्विकारण्याची मानसिकता शिक्षण तयार करते. थोडक्यात, चार भिंतीपलीकडील जीवन जगण्याकरता ''सक्षम'' करण्याची प्रक्रिया म्हणजेच शिक्षण. प्रत्येक क्षणाला माणसाला नवीन अनुभव येत असतो, त्या अनुभवाला अर्थ देण्याचे काम शिक्षण करतेः यशाबरोबर अपयशालाही पचवण्याची ताकद शिक्षण देते. संघर्ष, स्पर्धा, दडपण, वैफल्य याचा अनुभव प्रत्येक व्यक्तिला जीवनांत येत असतो. या वास्तवाला नाकारणे किंवा शिक्षणामधून अशा अनुभवांना हद्दपार करणे, आणि याला 'शिक्षण धोरण' समजणे म्हणजे शिक्षणालाही ''साहसी खेळ'' बनवणे आहे.

स्वातंत्र्याचा खरा अर्थ शिक्षणातून कळतो. 'अधिकारा'चा दुसरा अर्थ म्हणजेच 'जबाबदारी' याचा साक्षात्कार शिक्षणच देते. पण स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचा ताबा राजकारण्यांकडे गेला. ताबा ठेवायचा म्हणजे नियंत्रणं आणावी लागतात. विद्यार्थ्यांपासून शिक्षकांपर्यंत एवढी नियंत्रणं लादली गेली आहेत की, त्यामुळे शिक्षणापेक्षा 'व्यवस्थे'ला जगवणं एवढाच त्याचा अर्थ राहिला आहे. यातला कुठलाही घटक त्यामुळे समाधानी नाही. सवंग लोकप्रियतेकरता किंवा राजकीय सोयीकरता या व्यवस्थेमध्ये आज नियमांचा एवढा गुंता झाला आहे की, तो ब्रह्मदेवालाही सोडवणं शक्य नाही. शिक्षक आमदार रामदास मोते यांनी, शिक्षकांच्या समस्येचे द्विशतक लवकरच गाठले जाणार असल्याचे भाकित केले

(पृष्ठ क्र.२ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

आहे. सवंग लोकप्रियतेकरता किंवा निव्वळ मतांच्या राजकारणामुळे अव्यवहार्य आणि अशक्य कोटीतली आश्वासन देत सुटायचे, आणि त्यांची पूर्तता व्हायच्याआधीच नवीन आश्वासनांचा पाऊस पाडायचा. या संदर्भात एकमेकांना छेद देणारे इतके सरकारी जीआर (GR) निघाले आहेत की, कुठलाही शिक्षक किंवा शिक्षण अधिकारी आपल्या सोयीचा अर्थ त्यातून लावून घेऊ शकतो. यामध्ये सर्वात मोठा बळी आहे तो शिक्षणाचा.

सरकारी शाळा या फुकटच असतात. मुंबई महानगरपालिका प्रत्येक विद्यार्थ्यावर दरवर्षी सुमारे ५९,००० रु. खर्च करते. ठाणे महानगरपालिकेचाही कमी-अधिक प्रमाणात खर्च तेवढाच आहे. मधले जेवण, गणवेश, पुस्तके, वह्या इ. सर्व सरकारी शाळांमधून फुकटच वाटण्यात येते. हे सगळे वाटप आणि व्यवहार या भ्रष्टाचाराच्या प्रचंड खाणी आहेत. आज पालकांनी या मराठी माध्यमांच्या शाळांकडे पाठ फिरवून इंग्रजी माध्यमांच्या शाळा स्विकारायला सुरुवात केली. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारी मराठी शाळांमधील शिक्षकांचा सुमार दर्जा!! हे कटू असले तरी वास्तव आहे. अर्थात याला अपवाद आहेतच. फुकटेपणापेक्षा लोकांना चांगल्या शिक्षणाची अपेक्षा आहे. फाटका कोट किंवा धोतर नेसणाऱ्या, तुटपुंजा पगार असूनही 'ध्येया' करता शिक्षकीपेशा स्विकारलेल्या शिक्षकांची आपण नाटक, सिनेमा, कादंबऱ्यांतून टिंगल केली, त्यांना अव्यवहार्य ठरविले. आता सुटाबुटातील, सहावा वेतन आयोग मिळूनही नाराज असलेल्या शिक्षकांपुढे आपण सर्वच हतबल आहोत. शिक्षक हा सुद्धा घडायला लागतो.

आर. श्रीनिवासन यांनी २५ मे २०१५च्या करंट सायन्स (Current Science) या संशोधन पत्रिकेमध्ये पदार्थ विज्ञानाच्या शिक्षकांच्या संदर्भात लिहिलेल्या संपादकीयामध्ये हाच मुद्दा मांडला आहे. (Vol. 108 No.10)

It is acknowledged that the role of a teacher in Society is important as he/she is mentor of many generations of young students who will shape the future of the country. As such great care should be exercised in the selection of teachers. The existing selection procedure is too casual to locate teachers with a depth of knowledge, ability to communicate and motivation to inspire young inquiring minds. There should be the important criteria involved in the selection of a teacher. However, in the existing political climate in the country a change in the selection procedures may not be possible.

नुकतीच महाराष्ट्राचे राज्यपाल विद्यासागर राव यांनी उच्च शिक्षणाच्या संदर्भात मुंबईत एक गोलमेज परिषद शिक्षणमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली घेतली. उच्चशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी अनेक कल्पना तेथे मांडल्या गेल्या. ठाणे महानगरपालिकेनेही ठाण्यात उच्च शिक्षणाचे केंद्र बनवण्याकरिता खिडकाळी येथील १२५ एकर जागा देण्याचे नुकतेच निश्चित केले. आयआयटी (IIT) आणि आयआयएम (IIM) सारख्या दर्जेदार संस्था तिथे आणण्याचीही घोषणा झाली. दुर्दैवाने दर्जेदार शिक्षण किंवा संशोधनामधला सगळ्यात मोठा अडथळा हा सरकारी हस्तक्षेप आहे, ते यांच्या गावीही दिसत नाही. आयआयटी किंवा आयआयएमसारख्या संस्थांमधून तयार झालेल्या विद्यार्थ्यांना शेवटी अमेरिकाच गाठावी लागते. शुद्ध पात्रतेवर आधारित, आणि सरकारच्या राजकीय हस्तक्षेपाशिवाय चालू असलेल्या तेथील विद्यापीठांमधील स्वातंत्र्य, या भारतीय विद्यार्थ्यांच्या बुद्धीचे आणि कार्यकुशलतेचे चिज करतात. संशोधनाकरता साधनांच्या उपलब्धते इतकीच स्वातंत्र्याचीही गरज असते. उच्च दर्जाच्या संशोधनसंस्था खुज्या, मताच्या राजकारणावर डोळा ठेवत सवंग लोकप्रियतेचा आधार घेत, सीमित क्षमतेच्या राजकारण्यांकडून कधीच निर्माण होऊ शकणार नाहीत.

विज्ञान आणि तंत्रज्ञानामध्ये अमेरिकन विद्यापीठे, जर्मन, फ्रेंच किंवा ब्रिटिश संस्था आघाडीवर आहेत, ते त्यांना मिळालेल्या स्वातंत्र्यामुळे. जात-पात-वंश यांना या व्यवस्थेमध्ये काडीचेही स्थान नाही. यामुळेच फक्त

(पृष्ठ क्र. ४० वर)

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.
# दिशा

**वर्ष सोळावे / अंक ९ / सप्टेंबर २०१५**



**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २० वे/अंक ३ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**


## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | मोइरंग: मणिपूर राज्यातील एक ऐतिहासिक ठिकाण | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | शास्त्रवेध-१: पाण्याच्या प्रावस्था (फेजेस) | श्री. नरेंद्र गोळे | ६ |
| ४) | नर्मदा परिक्रमा (भाग : १९) | श्री. अरविंद ओक | १० |
| ५) | कॅटफिशिंग - अखंड सावधान असावे ! | ज्योती सीताराम शिंदे | १३ |
| ६) | योग आणि निरोग | श्री. बीसेन सुकराम झीगार | १६ |
| ७) | मेंदू व मनाचे संशोधन Science of Neurology | श्री. ह. श्री. परांजपे | १९ |
| ८) | आमिश त्रिपाठीच्या 'शिवा ट्रायलॉजीच्या' निमित्ताने ... | प्रा. प्रशांत धर्माधिकारी | २० |
| ९) | आंतरजातीय विवाह - समस्या? | डॉ. राजा ढेपे | २३ |
| १०) | योगायोगाच्या निमित्ताने... | प्रा.अर्पणा कुलकर्णी-धर्माधिकारी | २९ |
| ११) | मी जवळून पाहिलेले दयानन्द | डॉ. वा. ना. बेडेकर | ३१ |
| १२) | परिसर वार्ता | संकलित | ३६ |



या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# मोइरंगः मणिपूर राज्यातील एक ऐतिहासिक ठिकाण

*मणिपूर राज्यातील ऐतिहासिक शहर मोइरंग व लगतच्या परिसराचे वर्णन करणारा लेख - संपादक*

कार्यालयीन कामकाजाच्या निमित्ताने मणिपूर राज्याच्या इंफाल शहरात जाण्याची मला संधी मिळाली. या परिसरात जाण्याची माझी पहिलीच वेळ होती. त्यामुळे, मला या परिसराबद्दल खूपच कुतूहल होते. शक्य झाल्यास आजूबाजूच्या ठिकाणांना भेट द्यावी असा विचार करूनच मी इंफालला गेलो. परंतु तेथील एका गटाने बंद पुकारल्यामुळे माझ्या इच्छेवर पाणी पडले. तरीही माझ्या मुक्कामाच्या शेवटच्या दिवशी एक संधी घेण्याचे मी ठरवले. माझे विमान दुपारी एक वाजता होते. त्यामुळे केवळ सकाळचे काही तासच मला उपलब्ध होते. ‘तेवढ्या वेळात एखाद्या ठिकाणाला भेट देता येईल का, अशी विचारणा मी माझ्या यजमानांकडे केली.’ ‘तुम्ही लवकर निघू शकला तर जवळच्या एका ठिकाणी आपण जाऊ शकतो’ असे त्यांनी सांगितले. पडत्या फळाची आज्ञा मानून मी सकाळी लवकर निघण्याचे कबूल केले. त्यानुसार पहाटे उठून तयारी केली, सकाळी साडेसहा वाजता नाश्ता केला आणि सात वाजता बाहेर पडायला सज्ज झालो. साधारणपणे दीड तासाच्या प्रवासानंतर आम्ही मोइरंग नावाच्या गावी पोहोचलो. वाटेत माझ्या यजमानांनी सांगितले की, त्या परिसरात असलेला एक मोठा तलाव दाखविण्यासाठी ते मला घेऊन जात आहेत. तलावाचा विस्तार खूप मोठा असून मधेमधे बेटे आहेत असे त्यांनी मला सांगितले. त्यामुळे विस्तीर्ण तलाव पाहण्याची मला उत्सुकता होतीच. तेथे पोहोचण्यासाठी आम्हांला मोइरंग गाव पार करावे लागले. गावातून जाताना आमच्या यजमानांनी एक महत्त्वाची माहिती दिली. ती त्यांच्याच भाषेत सांगणे अधिक उचित होईल.

मोइरंग या गावाला ऐतिहासिक महत्त्व आहे. सुभाषचंद्र बोस यांची आझाद हिंद सेना आणि इंग्रज सरकारची भारतीय सेना हे दोघे याच गावात एकमेकांना भिडले. दोन गटांत तुंबळ युद्ध झाले. त्या युद्धात इंग्रज सेनेचा आझाद हिंद सेनेने पराभव केला. आपल्या सेनेच्या विजयानंतर सुभाषचंद्र बोस यांनी स्वतः या गावात भारतीय तिरंगा फडकवला. भारतभूमीवर फडकवलेला तो पहिला ध्वज होता. ज्या ठिकाणी ध्वज फडकवला त्या ठिकाणी आता एक संग्रहालय आहे. सुभाषचंद्र बोस यांच्या दूरदृष्टीचे आणि आझाद हिंद सेनेच्या कर्तबगारीचे दर्शन आपल्याला या संग्रहालयात होते.

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात सुभाषचंद्र बोस यांनी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी पराकाष्ठेचे प्रयत्न केले याची मला कल्पना होती. ब्रह्मदेशाकडून भारतात प्रवेश करून पूर्वेकडील काही भाग त्यांनी जिंकून घेतला होता हे मी इतिहासाच्या पुस्तकात वाचले होते. परंतु युद्धाचे नेमके ठिकाण कोणते याबद्दल मला काहीच माहीत नव्हते. त्या दिवशी कर्मधर्मसंयोगाने मी त्या ठिकाणी पोहोचलो होतो. माझ्या दृष्टीने ती सुवर्णसंधी होती आणि ती सोडायची नाही असे मी मनाशी पक्के ठरवले. मला त्या गावाच्या महतीबद्दल पूर्ण माहिती मिळेपर्यंत आमची गाडी गावाच्या बाहेर पडली होती. ऐतिहासिक अशा महत्त्वाच्या ठिकाणाला भेट न देता आपण पुढे निघून आलो याचे मला वाईट वाटले. मी चालकाला गाडी मागे वळविण्याची विनंती केली. यावर माझ्या यजमानांनी सांगितले की, परत येताना आपण तिथे जाणारच आहोत. त्यामुळे गप्प

राहण्याखेरीज माझ्यापुढे कोणताही पर्याय नव्हता. लवकरच आम्ही तलावाजवळ पोहोचलो.




**तलावाचे दर्शन घेण्याची जागा**

दोन्ही बाजूला तलाव आणि मध्ये टेकडी असे एक ठिकाण आहे. एका टेकडीवर आसाम रायफल्सचे केंद्र आहे तर दुसऱ्या टेकडीवर एक पर्यटनस्थळ आहे. तिकडे आम्ही कूच केले. टेकडीवरून दोन्ही बाजूंना पसरलेला अथांग असा तलाव दिसतो. एवढा मोठा तलाव मी पहिल्यांदाच बघत होतो. तलावात मासेमारी करणाऱ्या अनेक बोटी होत्या. बांबूच्या काड्यांनी बनवलेल्या विशिष्ट आकाराच्या टोपल्यांचा उपयोग करून ते मासे पकडीत होते. त्या दंडगोलाकार असून एका बाजूला त्यांना निमुळते असे छिद्र होते. एकदा का मासा आत गेला की, त्याला बाहेर पडणे अशक्य होत असे. या टोपल्यांच्या काही प्रतिकृती सहलीच्या ठिकाणी बांधलेल्या उपाहारगृहात छताला चिकटवून ठेवलेल्या आहेत.



**मासे पकडण्याची टोपली**

तलावाचा विस्तार फारच मोठा आहे. त्या तलावात अनेक लहान लहान बेटं आहेत. या बेटांवर काही मच्छीमार बांधवांनी त्यांच्या राहण्यासाठी छोटेखानी घरे बांधली आहेत. केवळ बोट हेच त्यांचे दळणवळणाचे साधन आहे. त्याच्या मदतीने ते तलावाच्या किनाऱ्यावर येतात, आवश्यक त्या वस्तू घेऊन परत आपल्या बेटांवर जातात. तलावाच्या पाण्यावर तरंगणारी वनस्पती सर्वत्र दिसते. त्या वनस्पतीकडे पाहिले की निसर्गाने जणू हिरवा गालिचा अंथरला आहे असे वाटते.



**विस्तीर्ण परिसरात पसरलेला तलाव**

तलावाचे दृश्य विलोभनीय असेच होते. परंतु माझे लक्ष मात्र ऐतिहासिक स्थळाकडे लागले होते. कधी तिथे जाऊ असे मला वाटत होते. मी माझ्या यजमानांना तिथून लवकर निघण्याची विनंती केली. परंतु त्यांनी उपाहारगृहात चहापानाची व्यवस्था केली होती. ते होईपर्यंत तेथे थांबणे आवश्यक होते. चहापान झाल्यावर लगेच आम्ही मोइरंग गावाकडे कूच केले. गाव तसे लहानच होते. रस्ते अरुंद असून रस्त्यांच्या दोन्ही बाजूला रोजच्या उपयोगाच्या वस्तू विकणारी दुकाने होती. ती सगळी दुकाने स्थानिक स्त्रियांनी चालवलेली होती. बाजारातील गर्दीतून वाट काढत आम्ही लवकरच आमच्या इच्छित स्थळी पोहोचलो. आजूबाजूला असलेल्या लहान लहान घरांमध्ये संग्रहालयाची इमारत उठून दिसते. इमारतीच्या चारही बाजूंनी कुंपण घातलेले आहे. कुंपणाच्या आतल्या भागात शोभिवंत झाडे लावली आहेत. दारातून प्रवेश करताच तिथल्या अधिकाऱ्यांनी आमचे स्वागत केले. संग्रहालयाची जुजबी माहिती देऊन ते आम्हांला आत घेऊन गेले.



**संग्रहालयाची इमारत**

संग्रहालयात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्याशी संबंधित अनेक छायाचित्रे आहेत. प्रत्येक छायाचित्राजवळ त्याची थोडक्यात माहिती दिली आहे. कोठेही गेलो की फोटो काढण्याची मला भारी हौस आहे. परंतु संग्रहालयात फोटो काढायला मनाई आहे. त्यामुळे मला निराश व्हावे लागले. अनेक दुर्मीळ छायाचित्रे तिथे प्रदर्शित केलेली आहेत. दुसऱ्या महायुद्धात नेताजी सुभाषचंद्र बोस इंग्रज सरकारची सुरक्षाफळी भेदून भारताच्या बाहेर पडले. जर्मनीत जाऊन ॲडाल्फ हिटलरची भेट घेतली. या दोन महान योद्धयांच्या भेटीचे दुर्मीळ छायाचित्र तिथे ठेवले आहे. जर्मनीतून समुद्रमार्गाने ते जपानमध्ये पोहोचले. तेथील अधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यांच्याकडून मदतीचे आश्वासन मिळविले. या महत्त्वपूर्ण चर्चेची छायाचित्रे तिथे प्रदर्शित केलेली आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळवून देणे हे त्यांचे स्वप्न होते. त्यासाठी त्यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली. या सेनेत सामील होण्याचे आवाहन त्यांनी वेगवेगळ्या व्याख्यानांतून केले. जेथे प्रत्यक्ष जाणे शक्य नाही तेथे रेडिओच्या माध्यमातून ते लोकांपर्यंत पोहोचले. त्यांच्या आवाहनाला उत्तम प्रतिसाद मिळाला. मोठ्या संख्येने भारतीय लोक त्यांच्या सेनेत सहभागी झाले. आझाद हिंद सेनेची स्थापना, त्या सेनेने केलेले कार्य याची इत्थंभूत माहिती चित्ररूपाने संग्रहालयात दिलेली आहे. ती सगळी माहिती डोळ्यांत आणि मनात साठवून आम्ही संग्रहालयाच्या बाहेर पडलो.

मूळ संग्रहालयाजवळ आणखी एक भवन बांधण्यात आले आहे. या भवनात सभासंमेलने आयोजित करण्याची सुविधा आहे. या दोन इमारतींच्या मध्ये नेताजींचा एक भव्य पुतळा आहे. सैनिकी वेषातील हा पुतळा आपले लक्ष वेधून घेतो. त्या पुतळ्याजवळ उभे राहून छायाचित्र काढण्याची संधी मी लगेच घेतली.



**नेताजींचा भव्य पुतळा**

संग्रहालयाच्या परिसरातून आम्ही बाहेर पडणार तेवढ्यात तेथील अधिकाऱ्यांनी आम्हांला इमारतींच्या एका बाजूला येण्याची विनंती केली. तेथे एक फलक लावला होता. तिकडे त्यांनी आमचे लक्ष वेधले. त्या फलकावर लिहिले होते की '१४ एप्रिल १९४४ या दिवशी नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी या ठिकाणी भारतीय तिरंगा फडकवला होता.' ब्रह्मदेशात ून आझाद हिंद सेना भारतात शिरली. मोइरंग या गावाजवळ त्यांचे इंग्रज सैन्याबरोबर घमासान युद्ध झाले. या युद्धात इंग्रज सैन्याचा पराभव

(पृष्ठ क्र. १५ वर)

# शास्त्रवेध-१: पाण्याच्या प्रावस्था (फेजेस)


*'पाण्याच्या प्रावस्था' या विषयी माहिती या लेखात विशद केली आहे - संपादक*

वाफेतली ऊर्जा काढून घेतली तर तिचे पाणी होते. पाण्यातली ऊर्जा काढून घेतली तर त्याचा बर्फ होतो. बर्फातली ऊर्जा काढून घेतली तर त्याचे काय होते? त्याचे तापमान ऊर्जा काढून घेत जावी तसतसे घटत जाते. बर्फाला जसजसे निववत जावे तसतसे निववणाऱ्या पदार्थाचे तापमान वाढत जाते. म्हणजे मग तो पदार्थ पुन्हा बर्फास निववू शकत नाही. जेव्हा निववणारे पदार्थच संपत जातात तेव्हा मग बर्फाला आणखी निववणे शक्य होत नाही. कारण मग त्या तापमानापेक्षा कमी तापमानाचे निववणारे पदार्थच उपलब्ध होत नाहीत. अशा तापमानाला निव्वळ शून्य अंश तापमान म्हणतात. लॉर्ड केल्विन ह्यांनी त्याचा शोध लावला म्हणून त्याला शून्य अंश केल्विन म्हणू लागले. प्रत्यक्षात हे तापमान -२७३.१६ अंश सेल्शस एवढे असते.

निव्वळ शून्य तापमान ही एक तार्किकदृष्ट्या निश्चितपणे गाठली जाणारी अवस्था आहे. तिथे आजवर प्रत्यक्षात कुणीही पोहोचलेला नाही आणि पोहोचण्याची शक्यताही नाही, कारण त्या तापमानावर ना द्रव पदार्थ राहतात, ना वायुरूप पदार्थ राहू शकतात. केवळ घनरूपसृष्टी. साऱ्या जगाची अहिल्याच काय ती बनून राहते. फक्त शिळा. तेव्हा माणसे ती अवस्था पाहू, अनुभवू शकतील अशी सुतराम शक्यता नाही.

आता हे उघडच आहे की, इथपासून पुन्हा त्या बर्फाला ऊर्जा पुरवली तर त्याचे तापमान वाढू लागेल[१]. शून्य अंश सेल्शिअसला पोहोचल्यावर बर्फाचे पाण्यात रूपांतरण सुरू होईल[२]. पुरेशी ऊर्जा मिळताच शून्य अंश सेल्शिअस

### पाण्याचे प्रावस्थांतरण




तापमानावरच संपूर्ण बर्फाचे पाणी होईल. मग त्या पाण्याला ऊर्जा पुरवत राहू तसतसे त्याचे तापमान वाढत राहील. शंभर अंश सेल्शिअसपर्यंत तापमान वाढल्यावर, ऊर्जा पुरवतच राहिल्यास तापमान न वाढता त्याच तापमानावर पाण्याची वाफ होईल[३].

मात्र ऊर्जा सामावत, वाफ न होऊ देता पाण्याला पाणीच ठेवायचे असेल तर दाब वाढवावा लागतो. उदाहरणार्थ प्रेशर कुकर. कुकरमध्ये पाण्याची वाफ १०० अंश सेल्शसहून अधिक तापमानावर होत असल्याने, जी डाळ एरव्ही सहजी शिजत नाही ती कुकरमध्ये मऊसूत होते. आण्विक भट्ट्यांमध्ये निर्माण होणारी ऊर्जा बाहेर काढण्यासाठी असेच दाबित पाणी वापरले जाते. त्या पाण्याची ३०० अंश सेल्शसहून अधिक तापमानावरही वाफ होऊ नये म्हणून त्या पाण्यास १०० किलोग्रॅम प्रति वर्ग सेंटिमीटर दाबावर ठेवले जाते. हे करण्याचे कारण म्हणजे वाफेपेक्षा पाण्यात उष्णतावाहकता जास्त असते व म्हणून मोठ्या प्रमाणावर निर्माण होणाऱ्या ऊर्जेस लगबगीने बाहेर काढून घेऊन वाढत्या तापमानाचा धोका टाळता येतो. अशा प्रकारच्या कारणांसाठी दाब वाढवत वाढवत पाण्यास पाणीच

ठेवत ऊर्जा देत गेले तर ३७४ अंश सेल्शसच्या आसपास त्या पाण्याची घनता त्याच तापमानावरील व दाबावरील वाफेच्या घनतेएवढीच होते आणि मग पाणी व वाफ ह्यांमध्ये काहीच भेदभाव उरत नाही. पाणीही वाफेगत उडू लागते आणि वाफही पाण्यागत बुडू लागते. अशा संमिश्र कोलाहलाच्या स्थितीला प्राकल (प्लाझ्मा) म्हणतात. अगदी सूर्यात असते तसेच अखंड वायुरूप.

पाण्याच्या मूलभूत प्रावस्था चार आहेत. बर्फ (घन), पाणी (द्रव), वाफ (वायू) आणि प्राकल (वीज).



**पाण्याची घन अवस्था - बर्फाची लादी**



**पाण्याचा स्फटिक**



**द्रव अवस्था-पाण्याचा थेंब**



**वायू अवस्था - वाफ**



**प्राकल अवस्था - वीज**

अशा प्रकारे आपण हे पाहिले की पाण्याचा शून्य ऊर्जेकडे होणारा प्रवास त्याला सर्वघन अवस्थेकडे घेऊन जातो. तर त्याच पाण्याचा ऊर्जस्वलतेकडील प्रवास त्याला प्राकलावस्थेत (प्लाझ्मा अवस्थेत, सूर्यांतर्गत असणाऱ्या अवस्थेप्रत) सर्ववायू अवस्थेपर्यंत घेऊन जातो.

बर्फाची लादी, फ्रीजमधील बर्फाचे ठोकळे इत्यादी पाण्याच्या घनावस्था आपल्याला माहीत असतात. आपल्या ओळखीच्या असतात. हवेतून पावसाचे पाणी जमिनीवर पडत असता, वाटेतच ते संपूर्णतः गोठते तेव्हा निर्माण होतात गारा. त्याही आपण ओळखतोच. मात्र, जेव्हा हवेतून पडणारे पावसाचे पाणी जमिनीवर पडत असता, एकदम संपूर्णपणे न गोठता सावकाश साकळत जाते तेव्हा, त्याचे स्फटिक तयार होतात. हलव्याला काटे फुटतात, मात्र साखरफुटाणे गुळगुळीतच राहतात, तसे हे असते. साकळत असतांना विस्ताराची संपूर्ण स्वायत्तता मिळत गेल्यास, पाण्याचे स्फटिकांत रूपांतरण होते. तशी स्वायत्तता न मिळाल्यास, किंबहुना तसा अवधीच न मिळाल्यास, त्या पाण्याच्या अचानक गोठून गारा होतात. साखरफुटाण्यांसारख्या.

पाण्याच्या घन म्हणजे बर्फ अवस्थेचा स्पर्श अतिथंड असतो. ह्या थंडाव्याचा उपयोग आपण शीत-कपाटांमध्ये (फ्रीजमध्ये) चांगल्या प्रकारे करून घेत असतो. आइस्क्रीम करत असतो. पदार्थ न नासता ताजे ठेवू शकत असतो. मासे

---

विचार हेतूकडे नेतो, हेतू कृतीकडे नेतो, कृतीमुळेच सवय लागते, सवयीमुळे स्वभाव बनतो आणि स्वभावामुळेच साध्य प्राप्त होते. म्हणजे विचार हीच यशाची पहिली पायरी आहे.

तर बर्फाच्या लाद्यांतच ठेवले जातात. मात्र, हिमनदीवरून तासभर जरी चालायची पाळी आली तरी शरीर गारठून जाते. पायाला हिमदंश होऊ शकतो. बोटांना, हाता-पायांना अचेतनता येते. अवयव निकामी होऊ शकतात.

पाण्याची द्रव अवस्था म्हणजे आपले रोजच्या वापरातले पाणी. हौद, नदी, पाणवठे, जलाशय, तलाव, समुद्र इत्यादींतले पाणी. पावसाचे पाणी. पाण्याचा गुणधर्म थंडावा देण्याचा असतो. स्वच्छ करणारा असतो. सुखावह असतो.


वाफ अवस्थेतले पाणी वायुरूप असते. प्रेशर कुकरमधून बाहेर पडणारी वाफ, वाफेच्या इंजिनातून सोडली जाणारी वाफ, हिवाळ्यात तोंडातून बाहेर पडणारी वाफ, चहाच्या किटलीतून बाहेर उंच झेपावणारी वाफ आपल्या परिचयाचीच असते. वाफ ऊर्जस्वल असते. उष्णता हा तिचा स्वभाव असतो. वाफेने शरीर भाजू शकते.

पाण्याची सर्वाधिक ऊर्जस्वल अवस्था म्हणजे प्राकल. पावसाळ्यात, विशेषतः पावसाळ्याच्या सुरुवातीस आकाशातून पडणारी वीज म्हणजे पाण्याची प्राकल अवस्था होय. ह्या अवस्थेत पाण्यातील मूलके (आयन्स) सुटी होतात. स्वैर संचार करू लागतात. मानवी शरीरास प्राकलाचा स्पर्श अत्यंत हिंसक असतो. वीज अंगावर कोसळल्यास माणसे जळून जातात. झाडे कोळपून कोळसा होतात. इमारती कोसळतात. तरीही प्राकलावस्थेचा उपयोग मानवाने अत्यंत हुशारीने करून घेतलेला आहे. हल्लीचे प्राकल दूरदर्शक (प्लाझ्मा टी.व्ही.) हे त्याचेच एक उदाहरण आहे.

मात्र उष्मा-द्रवचालिकीय (थर्मल हायड्रॉलिक्स) शास्त्रानुसार, बर्फाला ऊर्जा पुरवू लागल्यावर जर सभोवतालच्या वातावरणाचा दाब, समुद्रपातळीवरील वातावरणाच्या दाबाहून कमी असेल, तर पाण्याचा एक वेगळाच प्रवास अनुभवास येतो. ऊर्जाप्राप्तीनंतर त्या बर्फाचे पाणी होत नाही, तर थेट त्याची वाफच होते. आपल्या सभोवतालच्या वातावरणाचा दाब कायमच समुद्रपातळीवरील वातावरणाच्या दाबाच्या आसपासचा राहत असल्याने आपल्याला, असला अद्भुत प्रवास कधीही दिसू शकत नाही. ह्या प्रक्रियेस संप्लवन म्हणतात.

साधारणतः इंग्रजी वायच्या आकाराचे दिसणारे खालील आलेखचित्र, दाब x तापमान प्रतलावरील पाण्याचा ऊर्जाप्रवास अभिव्यक्त करत असते. सामान्यपणे आपण मधल्या आडव्या तुटक आलेखरेषेवरच वावरत असतो, जिथे वातावरणीय दाब १ असतो. इंग्रजी वायच्या उजव्या वर जाणाऱ्या आलेखरेषेवर, डावीकडून उजवीकडे जात असता पाणी उकळून वाफ होत असते, म्हणून ह्या आलेखरेषेला उकळण किंवा उत्कलनरेषा म्हणतात. ह्या आलेखरेषेवरील सर्वांत वरच्या बिंदूला क्रांतिक बिंदू म्हणतात. इथपासून पुढे पाण्याची ऊर्जा आणखी वाढवत गेल्यास, पाण्याची आणि वाफेची घनता समसमान होते. मग वाफ पाण्यात बुडू लागते आणि पाणी वाफेत उडू लागते.

### संप्लवनाचे शास्त्रीय स्पष्टीकरण




**पाण्याचे प्रावस्थाचित्र, दाब x तापमान प्रतलावरील, त्याचा ऊर्जाप्रवास दाखवत असते.**

इंग्रजी वायच्या खाली जाणाऱ्या आलेखरेषेवर, डावीकडून उजवीकडे जात असता बर्फाचे संप्लवन होऊन त्याचे थेट वाफेतच रूपांतरण होत असते, म्हणून ह्या आलेखरेषेला संप्लवनरेषा म्हणतात. ह्या तिन्ही रेषा ज्या

बिंदूत परस्परांना मिळतात, त्या बिंदूवर म्हणजेच त्या दाब आणि तापमानावर बर्फ, पाणी आणि वाफ तिन्ही प्रावस्था अस्तित्वात राहू शकत असतात, म्हणून त्या बिंदूस त्रय-बिंदू म्हणतात. त्रय-बिंदूपासून डाव्या बाजूस वर जाणारा आलेख, वितळण रेषा व्यक्त करत असतो. ह्या रेषेवर डावीकडून उजवीकडे जात असता बर्फाचे पाणी होत असते. अशा प्रकारे वरील निळसर भागात पाणी द्रव स्वरूपात राहते. उजवीकडील हिरवट भागात ते वाफरूप वायुस्वरूपात राहते. तर डावीकडील पांढऱ्या भागात पाणी बर्फरूप घन स्वरूपात राहत असते.

विश्वात पाणी त्याच्या शुद्ध प्रावस्थांत तर आढळून येतेच. शिवाय ह्या प्रावस्थांची मिश्रणेही आढळून येतात. जसे की ढग. ढगात पाण्याच्या चारही प्रावस्था आढळून येतात. मात्र ढग ही काही पाण्याची पाचवी शुद्ध प्रावस्था नाही. ढग हे पाण्याच्या चारही प्रावस्थांसहित इतर पदार्थांसोबतचे मिश्रण असते. ढगात धूर, प्रदूषणाचे धुके, धूळ, अपरिमित ऊर्जा, इत्यादी इतर घटकही असू शकतात. कविकुलगुरू महाकवी कालिदास, आपल्या मेघदूत ह्या महाकाव्यात ढगाचे वर्णन खालीलप्रमाणे करतात.

धूमज्योति: सलिलमरुतां संनिपात: क्व मेघ:
संदेशार्था: क्व पटुकरणै: प्राणिभि: प्रापणीया: ।
इत्यौत्सुदक्यादपरिगणयन्गुह्यकस्तं याचे
कामार्ता हि प्रकृतिकृपणाश्चेतनाचेतनेषु ॥ - मेघदूत ५/१२८, कविकुलगुरू महाकवी कालिदास

म्हणजे

पाणी, वारा, जलसहित ज्योती, घडे ज्या ढगाला ।
प्राण्यांद्वारे प्रेष्य हितगुजा, पाठवावे तया का ॥
औत्सुक्याने न गणुन मुळी, पाठविले ढगा त्या ।
कामातुरा फरक न कळे, चेतनाचेतनांते ॥ - मराठी अनुवाद: नरेंद्र गोळे २०१५०५२३

अतिउंचीवरचे ढग ६,००० मीटर किंवा जास्त उंचीवर असतात. त्यांचा रंग सहसा पांढरा असतो. विषेशतः सूर्योदयाच्या किंवा सूर्यास्ताच्या वेळी, यांच्यात आपल्याला अनेक रंगांच्या छटा दिसू शकतात. मध्य उंचीवरचे ढग १,८०० ते ६,००० मीटर उंचीवर असतात. या ढगांत पाण्याचे खूप छोटे छोटे कण किंवा बर्फाचे स्फटिक असतात. कमी उंचीवरचे ढग जमिनीपासून ते १,८०० मीटर उंचीपर्यंत राहतात. यांत प्रामुख्याने पाण्याचे बारीक कण असतात.

**संदर्भ:**

१. ऊर्जेचे अंतरंग-०७: शून्य ऊर्जेकडे आणि ऊर्जस्वलतेकडे वाटचाल http://urjasval.blogspot.in/2010/05/blog-post_2820.htmllinks
२. शुद्ध पदार्थांची प्रावस्थाचित्रे (फेज डायग्राम्स ऑफ प्युअर सब्सटन्सेस) http:/www.chemguide.co.uk/physical/phaseeqia/phasediags.html
३. ढगांचे प्रकार http://www.iucaa.ernet.in/scipop Obsetion/clouds_M.htm
४. पाण्याचे स्फटिक http://en.wikipedia.org/wiki/Ice

[1]एक ग्रॅम पाण्याला, प्रमाण वातावरणीय दाबावर, १ अंश सेल्शस तापवण्याकरता आवश्यक असलेल्या ऊर्जेस एक कॅलरी ऊर्जा म्हटले जाते.

[2]एक ग्रॅम बर्फाचे, प्रमाण वातावरणीय दाबावर, पाण्यात रूपांतरण करण्यास लागणाऱ्या ऊर्जेला घनावस्थांतरण ऊर्जा म्हटले जाते. ही ८० कॅलरी इतकी असते.

[3]एक ग्रॅम पाण्याचे, प्रमाण वातावरणीय दाबावर, वाफेत रूपांतरण करण्यास लागणाऱ्या ऊर्जेला वायूअवस्थांतरण ऊर्जा म्हटले जाते. ही ५४० कॅलरी इतकी असते.

**- नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ छेदगल्ली, टिळकनगर,
डोंबिवली (पू.) - ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

# नर्मदा परिक्रमा

**भाग : १९**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत - संपादक*

**दिवस ५५ वा. मोदरिया (च्यवनाश्रम) - तराण्या २२ कि.मी. मुक्काम प्राथमिक शाळा.**

मोदरिया आश्रम जंगलात. बाजूच्या छोट्या गावात काय नि इथे काय वीज पुरवठाच नाही. वनभागामुळे आधीच थंड; त्यातून रात्री इतकी थंडी की अशोक दांपत्याला गादी अंगाखालून काढून पांघरायला घ्यावी लागली. कारण आश्रमात कांबळी नव्हती. मी सतरंजीवर होतो. माझी SL Bag चांगली असल्याने थंडी फार जाणवली नाही.

चहापाण्यावीना (७.४५ पर्यंत वाट पाहून) आश्रम सोडला. गंमत म्हणजे कोणीही काहीही वास्तपुस्त केली नव्हती.

आजचा मार्गही साग, पळस आणि बेक यांच्या दाट जंगलातून होता. थंडीने कुडकुडत होतो. सूर्य उगवला तरी थंडी कमी होत नव्हती.



आकाश रंग आज दाट निळाभोर होता. स्वच्छ निरभ्र आकाश म्हणूनही थंडी वाढली असावी. रस्ते तांबडमातीचे होत गेले. दरिडया गावात थोडी शेती दिसली पण आता फक्त सागांनी भरलेले वन दूरदूरपर्यंत (सपाटीमुळे) दिसत होते. ती सागाची असंख्य झाडे-पानगळीमुळे दुतर्फा भरपूर पाने पडली होती. वाळून वाळून बहुतेक पानांची जाळी झाली होती. रानामध्ये ठिकठिकाणी मुंग्यांची वारुळे दिसली. काही खूप मोठी पण सोडून दिल्यासारखी; तर काही अगदी नवजात, काळीभोर आणि छोट्या शिखरांनी व्यापलेल्या पर्वतराजीप्रमाणे! अकरा किलोमीटर चालल्यानंतर पहिले गाव आले कुण्डी. परिक्रमावासींच्या सोयीसाठी अधेमधे बाण काढलेले आहेत. परंतु नर्मदा प्रसादांच्या पुस्तकात हे अंतर फक्त २ कि. मी. दिल आहे.

रस्त्याने एका बाजूला दूरपर्यंत पाण्याचा शान्त स्वच्छ नितळ पण अति संथ प्रवाह आपली सोबत करतो. ते सोडल्यास वाटेत वस्ती नाही, हॅण्डपंप नाही, काही नाही.

कुण्डीला सदांवर्त घेऊन एकत्र खिचडी केली. गोगटे जाधव, बिपिन गुरुजी आम्ही तिथे अशी मिळून खिचडी केली तोवर पिरू व गोराबाई हे जोडपेही आले. एकंदरीत खिचडी पुरली.

पुढे ११ कि. मी.वर तराण्या गाव आहे. ते संध्या. ५॥ वाजता गाठले.

मधे ३ कि.मी.वर बडेल लागले. त्यानंतर या गावाजवळ खूप पोपट पाहिले. ते सडसडीत, लांब व वेगळ्या रंगाची चोच असलेले होते. ते झाडावरून उडाले तेव्हा प्रत्येकाच्या चोचीत एक धागा होता! या झाडाचा तंतूमय भाग घेऊन बहुधा घरटे बांधत असावेत.

चार वाजल्यानंतर ५॥ वाजेपर्यंत अगदी दाट

---

भूतकाळ सतत डोक्यात ठेवला तर आपण आपला वर्तमानकाळ बिघडवत असतो. म्हणून जुन्या झालेल्या चुका विसरून पुन्हा नव्याने कामाला लागलं पाहिजे.

जंगलातून, कच्च्या पण मोठ्या गाडी रस्त्याने तराणा गाठले.

अतिशय आदराने व अगत्याने स्वागत झाले. हे गाव डोंगराच्या अगदी कुशीत आहे. शेती आहे ती या कुशीत येईल इतकीच व पाच पंचवीस घरांपेक्षा अधिक घरे नाहीत.

सोडून दिलेल्या शाळेत निवारा, समोरच्या चारण कुटुंबाने पोळ्या व भाजी प्रेमाने आणून दिली. या गावात हातपंपाचे पाणी मचुळ आहे. ते कुणी पीत नाही. नदीचे पाणी पिण्यासाठी वापरतात. नदी अगदी जवळ आहे. ही नदी पार केली की खरगोन जिल्हा समाप्त होऊन 'देवास' जिल्हा सुरू होतो.

आजची चाल २४ कि. मी. झाली असावी. अद्भुत गोष्ट म्हणजे रात्री १२ वाजता येणारी वीज आज सहा वाजता आली आणि मिळालेल्या चार्जरवर कॅमेरा बॅटरी पूर्ण चार्ज करता आली.

मी वजन नको म्हणून चार्जर घेतला नव्हता. कारण च्यवन आश्रमात गोगटे, बिपिन गुरुजी, जाधव यांचा गट मुक्कामी भेटला. सहज चौकशी केली तर जाधवांनी चार्जर (पुण्याहून मागविलेला) मला दिला, परंतु त्या आश्रमात, गावात वीजच नाही. आज मात्र पुन्हा एकत्र मुक्काम झाल्याने चार्जर रात्री बारा नंतर वापरायचे ठरविले. सहा तास तरी मिळाले असते, परंतु वीज संध्याकाळी सहा वाजताच आली आणि मैय्याच्याच कृपेने पुढचे काम झाले.

बडेल गाव बरेच अलिकडे ९ कि. मी. पण तेथेहि विहिर व बोअरिंगला पिण्यालायक पाणी नाही.

**दिवस ५६ वा - तराणिया सेमली आश्रम**

काल खाल्लेली रोटी की हातपंपाचे पाणी, काही तरी बाधले आणि रात्री दीड वाजता, पहाटे पाच वाजता व निघण्यापूर्वी पावणे सात वाजता शौचास जावे लागले.

अशोकला उठवून गोळी मागणे जिवावर आले होते व फार काही बिघडलेले नाही ही खात्री होती, म्हणून गोळी घेतली पण सकाळी!

सकाळी निघालो ते चपला घालून. कारण गावाजवळची नदी ओलांडून पलीकडे जायचे होते.

पाणी फार नव्हते. थंडी होती. त्यामुळे पाण्यावर वाफा येत होत्या. पाणी कोमट होते. नदीच्या प्रवाहातील गोटे पायांना टोचत होते, सहन होत नव्हते. एक प्रवाह ओलांडला तर पात्रातच थोडी कोरड सोडून पुन्हा प्रवाह होता. तोही ओलांडला.

पुढे जाऊन बूट घातले. परंतु आता पाय, सर्व शरीरच गारठले आणि चालणे कठीण झाले. बराच वेळ पाय बधिर होते.

आताचा रस्तासुद्धा पूर्ण सागवनांतून पिंपरीपर्यंत होता. काल-परवापासून रस्ता लाल मातीचा आहे. वाटेत भरपूर पोपट दिसले. वारुळे तर जागोजाग. आज बेलाचे वृक्ष दिसले नाही. मैय्या दूर असल्याने पाणपक्ष्यांची सनई, कलकल नव्हती. बारभाई (सातभाई) चा गोंगाटही नव्हता. मऊ मातीत मात्र ठसे दिसले ते मोठे व शेजारी छोटे असे बराच वेळ दिसत होते. बहुधा ते अस्वल व पिलू यांचे असावेत. मोराच्या पायाचेही ठसे दिसले (आमच्या बरोबर असलेल्या बिपिन गुरुजींचे हे सारे अनुमान.)



दोन-अडीच तास चालल्यावर पिंपरी आले. आता नदी ओलांडल्यापासून देवास जिल्हा सुरू झाला आहे.

पिंपरी गावाजवळ आलो आणि प्लास्टिकच्या पिशव्यांचा प्रचंड कचरा इतरत्र विखुरलेला दिसला. खेड्यांमध्ये हा कचरा फार दिसत नाही. शहरीकरणाची पहिली खूण म्हणजे हा अविद्राव्य साठा!

दोन-अडीच तासात हे गाव गाठले होते. चहा पोहे न्याहारी केली. 'भोजन करणार का? की सदावर्त देऊ की पुढील ठिकाणी शिजवाल'? अशी विचारणा एका दुकानदार गृहस्थाने जवळ येऊन स्वतःहून केली. आमचा विनम्र नकार.

पिंपरी गावापासून डांबरी रस्ता सुरु झाला. अरण्य नाहीसे झाले. उन्हाचा चटका जाणवला आणि अचानक छाती भरल्यासारखी झाली. एरव्ही सकाळी स्तोत्रे मोठ्याने, आनंदाने म्हणणारा मी हिंमतच होईना. खूप थकवा अचानक जाणवायला लागला. आजची वाटचाल २४ कि.मी. कशी झेपणार हा प्रश्न उभा राहिला. खांदे दुखत होते. सॅकमुळे त्रास होत होता. अखेर एक बुफेन घेतली. मेहन्दीखेडा जाऊन हळूहळू रतनपूर गाठले.

रतनपूर हे शेवटचे गाव. बससेवा इथे संपते. बसेस परत जातात. परिक्रमामार्ग इथून पुढे सेमला, लकडकाटे जंगल असा जातो. परंतु कोणतीही वाहतूक या मार्गाने होत नाही. लकडकाटे जंगलात तर मोटरसायकलीसुद्धा जात नाहीत. कारण इकडले इकडे आणि तिकडले तिकडे.

रतनपूर गावात चहा मिळाला. त्याच्याबरोबर काल उरलेल्या दोन पोळ्या तिघात वाटून खाल्ल्या. माझा अशक्तपणा पळाला.

रतनपुरनंतर सडक संपली व जंगलचा कच्चा रस्ता सुरू झाला.

आधी ऊन. नंतर झाडी सुरू झाली व अधेमधे शेती व गाव असा क्रम ३/५ कि.मी.ने सुरू राहिला. अखेर ४।। च्या सुमारास सेमल हा लकडकोट जंगालाच्या तोंडाशी असलेला आश्रम गाठला.

नदीकिनारी डुबलेला आश्रम आता इथे आला हे आई व उत्तर प्रदेशचे एक बाबा सहकुटुंब हा आश्रम गेली ८ वर्षे सांभाळत आहेत व परिक्रमावासियांना उत्तम वागणूक व तयार भोजन देतात. त्यांचे कुटुंबीय सेवाभावाने, प्रेमाने, मैय्या श्रद्धेने हे सारे करतात.

रात्री पोळ्या व आमटी (दाल) हा सुंदर बेत होता. एकूण ९ मूर्ती होत्या. (+ कुटुंबीय). मंगलने पोळ्या करण्यास पूर्ण सहकार्य (सर्व पोळ्या लाटल्या). उद्या जंगलात खाण्यासाठी प्रत्येकी २/२ पोळ्या हव्यात ही गोष्ट आश्रमात सांगितली होती. त्यानुसार भरपूर पोळ्या तयार झाल्या.

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

**दिशा नियमित वाचा.**

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

साधू असावेत, पण सावधान करणारे - राष्ट्रसंत तुकडोजी महाराज.

# कॅटफिशिंग - अखंड सावधान असावे !

*'कॅटफिशिंग' बद्दलची माहिती या लेखात देण्यात आली आहे - संपादक*

अंकिता समोरच्या भिंतीकडे भावशून्य नजरेने पाहत होती. तिचा चेहरा ओशाळला होता. मी काय विचारत होते याकडे तिचे लक्ष नव्हते. तिची कानउघडणी करू की नरमाईने समजावू हेच मला समजत नव्हते. अंकिता माझी बालमैत्रीण. अत्यंत हुशार व अभ्यासू. उच्चशिक्षित होती आणि नोकरीही करत होती. पण ती एका विचित्र पेचप्रसंगात सापडली होती. अंकिताची फेसबुकवर कुणा इसमाशी ओळख झाली. सुरुवातीच्या hi -hello चे रुपांतर तासनतास चालणाऱ्या chatting मध्ये झाले. फेसबुकवर likes, comments, shares करत करत मोबाईल नंबरची देवाणघेवाण झाली. मैत्रीचे रूपांतर आकर्षणात आणि आकर्षणाचे रूपांतर प्रेमात झाले. प्रत्यक्षात कधीच न भेटलेला /पाहिलेला हा प्रेमळ व समजूतदार (भासणारा) इसम हाच आपला भावी जोडीदार याचा तिला साक्षात्कार झाला. योगायोगाने (किंवा दुर्दैवाने) त्याने तिला लग्नाची मागणी घातली. अंकिताच्या आईवडिलांना भेटण्याचा दिवस निश्चित केला. आणि ठरलेल्या तारखेच्या अगदी तीन दिवस अगोदर त्याने अंकिताला कळवले की त्याचा अपघात झाला आहे. अंकिता गांगरली. काही मदत हवी का? असे तिने विचारताच त्याने अगदी अनिच्छेने (पण पूर्वनियोजनाप्रमाणे) सांगितले, फक्त तीस हजाराची मदत कर. शस्त्रक्रिया झाली की लगेच पैसे परत करतो असे आश्वासन दिले. प्रत्येक बाबतीत हिशेबी असणाऱ्या अंकिताने इथे मात्र चूक केली. स्वकमाईतील तीस हजार त्याच्या खात्यावर पाठवले. नंतर काय? हाश -प्रेमी गायब, मोबाईल out of coverage. नंतर कळले की त्याने सांगितलेल्या हॉस्पिटलमध्ये त्या नावाची कोणतीही व्यक्ती भरती नव्हती. मग ती माझ्याकडे आली. माझे प्रश्न सुरू झाले. तिच्याशी चर्चा केल्यानंतर मला अनेक धक्कादायक बाबी समजल्या. अंकिताकडे त्या इसमाचा पूर्ण पत्ता नव्हता. त्याने दिलेले मित्रांचे नंबर लागत नव्हते. तिच्याकडे त्याचे जे सर्व फोटो होते त्यापैकी अनेक फोटोंमध्ये त्याने गॉगल लावला आहे, तर काही फोटो अंधुक प्रकाशात काढलेले. तिने त्याच्या कुठल्याही मित्रांशी किंवा नातेवाईकांशी प्रत्यक्ष संपर्क केला नव्हता. मग मी तिला शेवटचा प्रश्न विचारला, आर्थिक मदत करण्याअगोदर विचार का नाही केलास? पाणावलेल्या डोळ्यांनी ती म्हणाली, माझा विश्वास होता त्याच्यावर. (पानिपतमध्ये 'विश्वासा'चे काय झाले हे तिला बहुदा माहीत नसावे!). वाचक मित्रहो, आता तुम्ही म्हणाल, एवढी शिकलेली मुलगी अशी चूक कशी करू शकते ! हीच तर 'आंतरजालाची मायाजाल' आहे.

फेसबुकचे २.२ अब्जापेक्षा जास्त वापरकर्ते आहेत आणि व्हॉट्स-अपने ६०० दशलक्षपेक्षा जास्त सदस्यांची मजल गाठली आहे. रोटी, कपडा और मकान या प्राथमिक गरजांमध्ये फेसबुक, व्हॉट्स-अप आणि इंटरनेट यांचा 'अनिवार्य' म्हणून समावेश झाला आहे. यामुळे एक virtual समाज तयार झाला आहे की जिथे लोक फक्त फोटो आणि ऑनलाईन स्टेटसद्वारे एकमेकांना ओळखतात. आणि इथेच बरीच जण चूक करतात. कोणत्याही चौकशीविना /पुराव्याविना विश्वास ठेवला जातो. काही समाजकंटक याचाच फायदा घेतात. कोणा दुसऱ्याच व्यक्तीचे फोटो वापरून बनावट फेसबुक प्रोफाईल बनवून ही अज्ञात व्यक्ती तुम्हाला आपल्या जाळ्यात अडकविण्याचा

प्रयत्न करते. हेतू-एखाद्याची आर्थिक फसवणूक, त्याची बदनामी, त्याला गैर कृत्यात समाविष्ट करण्यासाठी आणि काही वेळेला तर निव्वळ चेष्टा म्हणून ! यालाच C-TPHISHING असे संबोधले जाते . २०१० साली सत्य घटनेवर आधारित `C-TFISH` नावाचा अनुबोधपट प्रदर्शित झाला. फेसबुकवर एका तरुणाची ओळख एका मध्यमवयीन विवाहित महिलेशी होते. तिच्या माध्यमातून त्या महिलेच्या 'मेगन' नामक मुलीच्या तो प्रेमात पडतो. पण अनेक विसंगत बाबी त्याचा लक्षात येतात व एकेदिवशी हा तरुण सरळ त्या महिलेच्या घरी अचानक भेट देतो. तेव्हा त्याला समजते की मेगन नावाची कुणीही मुलगी अस्तित्वात नसून ती महिला स्वतःच बनावट प्रोफाईल वरून त्या तरुणाशी लगट करीत असे.

तरुण-वृद्ध, मुली-मुले, विवाहित-घटस्फोटीत, श्रीमंत-मध्यमवर्गीय, उच्चशिक्षित-अडाणी कुणीही या कॅटफिशर्सच्या जाळ्यात अडकू शकते. आणि एकदा अडकल्यानंतर त्यातून 'बा इज्जत' बाहेर पडणे कठीण. आजची बिनधास्त तरुण पिढी आपल्या 'टाईमपास' नसलेल्या निखळ मैत्रीखातर किंवा 'पहला-पहला प्यार' च्या नादात आपली वैयक्तिक व संवेदनशील माहिती सहज share करतात आणि कॅटफिशिंगचे बळी ठरतात .

नोत्रे दमचा स्टार फुटबॉलपटू मनताय टेओ हा आठ राष्ट्रीय पुरस्कारांचा मालक, सोबत पैसा व प्रसिद्धी. त्याची Online प्रेयसी 'लेह्ने केकुआ' ही रक्तक्षयाने वारली अशी बातमी वाऱ्यासारखी पसरली आणि मनतायच्या सर्व चाहत्यांनी सहानुभूती व्यक्त केली. नंतर काही धाडसी पत्रकारांनी 'लेह्ने केकुआ' संबंधी अधिक माहिती शोधण्याचा प्रयत्न केला तेव्हा एक धक्कादायक बाब उघड झाली. 'लेह्ने केकुआ' ही काल्पनिक व्यक्ती होती व मनताय टेओच्या एका परिचित व्यक्तीने निव्वळ चेष्टा म्हणून बनावट फेसबुक अकौंट बनवून टेओला अडकवले. सर्व जगाला हे सत्य वृत्त समजले व या स्टार फुटबॉलपटूची नाहक बदनामी झाली.

तुम्हाला सोशल वेबसाइट्सवर चॅटिंग करताना खालील अनुभव आला आहे का?

१) एखादी अज्ञात व्यक्ती आपल्याशी online मैत्री करू इच्छिते आणि त्यासाठी खोटी स्तुती करते किंवा तुमच्या प्रत्येक फोटो व अपडेट्सला LIKE/ COMMENT करते.

२) शायरी, कविता, मोहक फोटो यांचा भडिमार करतात.

३) ही व्यक्ती फक्त इ-मेल/online chatting करते; व्हिडीओ चट/skype चा वापर टाळते.

४) प्रत्यक्ष भेटण्यास टाळाटाळ करते. भेटायला तयार झालीच तर तुम्हाला अनोळखी ठिकाणी एकटेच येण्यास सांगतात.

५) या ठिकानी दिलेले घरचे/कार्यालयीन पत्ते विसंगत व अपूर्ण; तर दूरध्वनी क्रमांक नेहमीच out of coverage / switch-off असतात.

६) ती व्यक्ती तुमच्या प्रेमात 'आकंठ' बुडाल्याचा भास निर्माण करते .

७) अश्लील दृक/श्राव्य साहित्य पाठवितात .

८) तुमच्याविषयी सखोल माहिती जाणून घेतात; पण तुम्हाला स्वत:विषयी 'ताकास तूर' लागू देत नाहीत.

९) तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवल्याची खात्री झाल्यावर ते तुम्हाला अपघात /मुलाचे किंवा आई -वडिलांचे आजारपण/परदेशी नोकरी लागल्याची कारणे सांगून तुमच्याकडून पैसे उकळण्याचा प्रयत्न करतात.

१०) काही जण धार्मिक /जातीय बाबींचे जाळे विणून तुम्हाला अडकवतात.

---

अक्कलशून्य माणसे दुसऱ्यांची निंदानालस्ती करण्यात सदैव आघाडीवर असतात. कारण 'निंदा करणे' ही एकच गोष्ट अशी आहे की त्यासाठी अक्कल लागत नाही. - सद्‌गुरु श्री वामनराव पै.

जर तुम्हाला वरीलपैकी अनुभव असतील तर समजून घ्या - तुम्ही कॅटफिशर्सच्या तावडीत सापडले आहात ! कोलोराडो येथील एका आई -मुलीच्या जोडीने ‘आम्ही अमेरिकन लष्करी सदस्य असून अफगाणिस्तान येथे मदतकार्य करतो’ अशी थाप मारून ३५० लोकांना मिळून एक दशलक्ष डॉलर्सला गंडा घातला.

यावर उपाय कोणता? एकच -‘अखंड सावधान असावे !’ अनोळखी व्यक्तीची सविस्तर माहिती मिळवून, पडताळा केल्यानंतरच त्यांना online /virtual मित्र बनवा. माहिती बनावट असेल तर त्या व्यक्तीला UNFRIEND /BLOCK करा . त्या व्यक्तीचे फोटो संशयास्पद वाटले तर GOOGLE REVERSE IMAGE SEARCH, FOTO FORENSICS, TIN EYE चा वापर करा. ठिकाण माहिती करण्यासाठी GOOGLE MAPS, WIKIMAPIA, GEOFEEDIA याचा वापर करा. तुम्ही ज्या वेबसाईट्स वापरता त्याची वैधता तपासा. स्वतःची वैयक्तिक/आर्थिक /कौटुंबिक माहिती (पत्ता, दूरध्वनी क्रमांक, पासवर्ड, पिन कोड ) सांगू नका. घरातील तरुणवर्ग किंवा लहान मुलांना कॅटफिशर्सची सविस्तर माहिती द्या. सगळ्यात घोडचूक म्हणजे कॅटफिशिंगची शिकार झालेली व्यक्ती भीतीने / लाजेखातर गप्प राहते, तक्रार करीत नाही. घरातील वडिलधारी व्यक्ती, तज्ज्ञांची आणि गरज वाटली तर पोलिसांची मदत घ्या. पुरावा जमा करण्याची सवय ठेवा. `CRIMINALS HAVE NO RELIGION `. तुम्ही जर कारवाई केली नाहीत तर हे समाजकंटक अन्य कुणाची शिकार करतील.

To be blind and forgiving the wrong is to allow the wrongdoer another chance to destroy someone else.

**- ज्योती सीताराम शिंदे**
महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय,
वेळणेश्वर.
भ्रमणध्वनी : ८८८८७४४७३२

(पृष्ठ क्र.५ वरून **मोइरंग: मणिपूर राज्यातील एक ऐतिहासिक ठिकाण**)

करण्यात आझाद हिंद सेनेला यश आले. हा विजय साजरा करण्यासाठी नेताजींनी भारतीय तिरंगा येथे फडकवला. स्वतंत्र भारतात फडकवलेला हा पहिला ध्वज होता. अशा एका महत्त्वाच्या ठिकाणाला भेट देण्याची संधी मला मिळाली. ही माझ्या दृष्टीने दुर्मीळ अशी संधी होती.



**ऐतिहासिक स्थळाजवळ घेतलेले छायाचित्र**

‘आंदोलन आणि असहकार करून भारताला स्वातंत्र्य मिळणार नाही. ते मिळविण्यासाठी युद्ध हाच एकमेव मार्ग आहे’ यावर नेताजींचा विश्वास होता. त्या दृष्टीने त्यांनी मनापासून प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांना काही अंशी यशदेखील मिळाले. भारताच्या उत्तरपूर्व प्रदेशाबरोबरच त्यांनी अंदमाननिकोबार बेटावरदेखील आपले वर्चस्व प्रस्थापित केले. दुसऱ्या महायुद्धात हिटलरचा पराभव झाला नसता तर चित्र काही वेगळेच दिसले असते. १९४५ साली जपान्यांनी शरणागती पत्करली. त्यामुळे त्यांच्याकडून मिळणारी मदत बंद झाली. त्यानंतर एका विमानप्रवासात नेताजींचा शेवट झाला. त्यामुळे नेताजींचे स्वप्न अपूर्णच राहिले.

**- डॉ. सुधाकर आगरकर**
सी-१४, विसावा, वैभवनगरी,
कल्याण-शीळ रोड, काटई,
ता. कल्याण, जि. ठाणे - ४२१२०४

अडचणींच्या काळातच आपल्या तत्त्वांची खरी परीक्षा असते. आपण प्रामाणिक आहोत का नाही हे अडचणी आल्याशिवाय कळत नाही.

# योग आणि निरोग

*योग ही एक अमूल्य देणगी आपणा सर्वांना मिळाली आहे. योगाची महत्ता विशद करणारा लेख - संपादक*

योग ही एक अमूल्य देणगी आपणा सर्वांना मिळाली आहे. सध्याच्या धकाधकीच्या जीवनात योगाची महत्ता फारच जाणवत आहे. आपल्या प्राचीन ऋषीमुनींनी जोपासून ही विद्या आम्हा सगळ्या भारतवासीयांनाच नव्हे तर सर्व जगाला दिली आहे.

**योग म्हणजे काय?**

सध्या योगाला खूपच प्रसिद्धी मिळाली आहे. कारण UNO मध्ये योग दिवस २१ जूनला मान्यता मिळाली आहे व भारत सरकारने जागतिक स्तरावर हा दिवस साजरा केला आहे. योग हा एक व्यायाम आहे का? किंवा ह्याचा शाब्दिक अर्थ काय आहे? योग म्हणजे 'जुळवणूक' असा अर्थ काढू या. कारण योगामुळे मन आणि शरीर यांचा समतोल साधला जातो. तर तो कसा? पतंजली ऋषी हे हठयोगाचे जनक. त्यांनी हठयोग प्रणालीचा उद्गम केला आहे. 'ह' म्हणजे 'इडा' आणि 'ह' म्हणजे 'पिंगला'. आता इडा व पिंगला म्हणजे काय? तर आपण श्वास क्रिया करतो त्या नासिकेला इडा व पिंगला संबोधिलेले आहे. इडा ही डावी नासिका व पिंगला ही उजवी नासिका. आपण जेव्हा श्वास घेतो तेव्हा इडा व पिंगला यांचा सतत वापर होतो आणि आपण नकळत ही क्रिया सतत करत असतो. स्वास्थ्याच्या दृष्टीने हीच क्रिया नियमाने केल्याने आपल्या शरीरातील बरेच विकार नाहीसे होतात. इडा नासिका शरीरात उष्णता निर्माण करते. थोडक्यात, आपण जर श्वास नासिकाचा वापर करून केला तर आपल्या शरीरातील बरीचशी विजातीय व हानीकारक तत्त्वे नाहीशी होऊन स्वास्थ्य लाभ होतो.

अष्टांग योगाची बहिरंग व अंतरंग साधना केल्याने 'हटयोग' आत्मसात होतो. तर मग हे काय आहे? ते आपण थोडक्यात जाणून घेऊ या. बहिरंग साधनेचे खालील प्रकार आहेत.

**१. यम** : अहिंसा, सत्य, अस्तेय (भौतिक गोष्टींचा भरपूर प्रमाणात मोह टाळणे) ब्रह्मचर्येचे शक्यतो पालन करणे (अपरिगृह) गरजेपेक्षा जास्त वस्तू न ठेवणे हे उपरोक्त यमचे घटक आहेत.

**२. नियम** : शौच : आंतरिक व बाह्य शुद्धता.

**संतोष** : सुखी राहून जगणे.

**तप** : सखोल प्रयत्न करून साध्य करणे.

**स्वाध्याय** : चांगल्या विचारांचा व पुस्तकांचा अभ्यास करणे.

**ईश्वर प्रणिधान** : ईश्वरावर श्रद्धा ठेवून सर्वस्व अर्पण करणे. तर यम हे सर्वत्र लागू आहे व समाजातील सर्व थरावर ह्याचा अवलंब व अंगीकरण आवश्यक आहे. यम व नियम योगाचे आधारस्तंभ आहेत. नियम हे साधकानी स्वतःशीच निगडित करून ते सातत्याने पालन करायचे असतात. यम व नियम यांचे पालन केल्यानेच आसन व प्राणायम सिद्ध होतात.

**३. आसन** : हा बहिरंग साधनेचा तिसरा प्रकार आहे. आसन केल्याने शरीराला बल मिळते. रोगप्रतिकारशक्ती वाढते. शरीर निरोगी होऊन कार्यक्षमता वाढते. स्वस्थ शरीरातच स्वस्थ मन शक्य आहे. अन्यथा आपले मन स्थिर न राहता भटक्यास्थितीत (चंचलपणा) राहण्याची शक्यता असते.

तर आसन प्रारंभ करण्याच्या अगोदर शरीराची शुद्धी

करणे अत्यंत आवश्यक आहे. तर शुद्धीक्रिया म्हणजे काय? सकाळी उठून नेत्रस्नान करणे, दात स्वच्छ करणे, जिव्हा स्वच्छ करणे आणि दोन ते चार ग्लास पाणी पिणे ह्यांत अंतर्भूत आहे. तर काही पुढच्या कठीण शुद्धीक्रिया पण करूशकतो. उदाहरणार्थ जलनेती : नाकात पाणी टाकून बाहेर काढणे, जलधौती : आठ ते दहा ग्लास पाणी उलटी (वमन) करणे. परंतु ह्या क्रिया कठीण आहेत व करताना फायद्याचे असते. अन्यथा त्रास होऊ शकतो. ह्या शुद्धीक्रिया केल्याने शरीरातील अतिरिक्त मेद नाहीसा होतो व आसन आणि प्राणायाम करणे सोपे जाते. काही ठरावीक आसने करणेच इष्ट.

**उदाहरणार्थ** : भुजंगासन, सर्वांगासन, मत्स्यासन, हलासन, पवनमुक्तासन आणि सूर्यनमस्कार.

**भुजंगासन** : हे आसन अतिशय महत्त्वाचे आहे कारण आपले पाठीचे विकार ह्या आसनाद्वारे दूर होतात व पाठदुखी हा विकार आपण कायमचा थांबवू शकतो.

**पवनमुक्तासन** : हे आसन आपल्या शरीरातील अतिरिक्त वायूचे निराकरण करते. त्यामुळे बैठे काम करणाऱ्या व्यक्ती ह्या आसनाचा लाभ घेऊन निरोगी राहू शकतात.

**सर्वांगासन** : हे आसन अतिशय महत्त्वाचे आसन आहे व शीर्षासनाचे जवळ जवळ सर्व लाभ ह्या आसनाद्वारे मिळतात. नावाप्रमाणेच ह्या आसनामुळे शरीरातील सर्व अवयवांना फायदा होतो व असंख्य रोग नाहीसे होतात. मात्र उच्च रक्तदाब असणाऱ्या व्यक्तींनी योगगुरुंचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

**मत्स्यासन** : हे आसन सर्वांगासनाचे पूरक आसन आहे व सर्वांगासन केल्यानंतर १/३ वेळ ह्या आसनाला देणे. हे आसन करताना शरीराचा आकार माशाप्रमाणे होतो.

**हलासन** : नावाप्रमाणेच आपल्या शरीराची स्थिती (आकृती) हल म्हणजे नांगर ह्यासारखी होते. अतिशय महत्त्वाचे आसन असून मधुमेह सारखे रोग सुद्धा ह्या आसनाद्वारे बरे होऊ शकतात.

**सूर्यनमस्कार** : ही एक स्वतंत्र आसन प्रणाली आहे व ह्यात बऱ्याच आसनांचा समावेश आहे. ह्या आसनाला ''सर्वांग सुंदर आसन'' असे पण म्हटले जाते. कारण ह्या आसनाद्वारे शरीर सुंदर व निरोगी होते व मनुष्य बलवान होऊन त्याची कार्यक्षमता वाढते. आपण लहानपणी शाळेत किंवा व्यायामशाळेत ही आसनं बऱ्यापैकी शिकले असतो. परत एकदा सांगू इच्छितो की, आसन व प्राणायाम आरंभ करताना मार्गदर्शन घेणे आवश्यक व गरजेचे आहे. त्यामुळे योगाबद्दल गैरसमज दूर होऊन जास्तीत जास्त लाभ मिळेल.

**प्राणायाम** : अगदी सोप्या भाषेत सांगेन म्हणजे इडा व पिंगला यांचा वापर करून एका विशिष्ट प्रकाराने श्वास घेणे व सोडणे जेणे करुन आतील दूषित वायू बाहेर येऊन शरीरात ताजा वायू जाऊन रक्ताची शुद्धता होते व फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढून प्राणवायू घेण्याची क्षमता वृद्धींगत होते. आपल्या शरीरात ७२,००० (बहात्तर हजार) नाड्या आहेत व त्यांची शुद्धिक्रिया ह्या प्राणायाम द्वारे होते. अतिरिक्त कोलेस्ट्रॉल व मेद नाहीसा होऊन हृदयाची रक्त पंपिंग शक्ती वाढून शरीर स्वस्थ व निरोगी राहण्यास मदत होते.

प्राणायामाचे प्रामुख्याने खालील प्रकार आहेत.

अ) नाडीशोधन प्राणायाम (अनुलोन-विलोम)
ब) कपालभाती प्राणायाम
क) उज्जयी प्राणायाम
ड) भ्रामरी प्राणायाम (ओंकार नाद साधना)

प्राणायाम करताना प्रामुख्याने तीन गोष्टी समजून घेणे आवश्यक आहे.

**रेचक** : श्वास जाणिवपूर्वक बाहेर सोडणे

**पूरक** : श्वास जाणिकपूर्वक आत घेणे

**कुंभक** : श्वास आत घेतल्यानंतर काही क्षण रोखून ठेवणे ह्याला अंतरकुंभक म्हणतात. तर श्वास सोडून तो बाहेर

काही क्षण रोखून ठेवणे. ह्याला बाह्यकुंभक असे म्हणतात. हे प्राणायाम करताना अनुभवी योगशिक्षकाचे मार्गदर्शन घेणे अत्यंत गरजेचे आहे. नुसता बघुन प्राणायाम व आसने केल्यास त्यांचा संपूर्ण फायदा कदाचित मिळणार नाही व कधीतरी अनुचितपणे आसन व प्राणायाम केल्याने नुकसान पण होऊ शकते.

अंतरंग साधनेचे चार प्रकार आहेत. त्यांचा फक्त थोडक्यात उल्लेख करतो. कारण बहिरंग साधना आपल्या सारख्या सांसारिक व सामान्य लोकांना जे सतत कार्यरत असतात त्यांना पुरेशी आहे.

अंतरंग साधनेचे प्रकार असे आहेत.

१. **प्रत्याहार** : वरील बहिरंग साधना केल्याने आपण आपल्या इंद्रियांवर विजय मिळवू शकतो. ह्या स्थितीला प्रत्याहार म्हणतात.

२. **धारणा** : हा प्रकार आापल्या शरीरातील विशिष्ट स्थानावर ध्यान धारणा करुन घेणे व स्वास्थ लाभ मिळविणे.

३. **ध्यान** : ही पुढची पायरी; जे शरीरातील विशिष्ट स्थानावर (उदारणार्थ अष्टचक्र) धारणा करते. त्यात एकाग्र चित्त करून ध्यान करून मन स्थिरावणे.

४. **समाधी** : ही अष्टांग योगाची शेवटची स्थिती आहे. ह्याचा शाब्दिक अर्थ घेऊ नये. ह्या स्थितीला फक्त निव्वळ आनंदाची प्राप्ती समजावी. आत्म्याचे पंचकोन (आनंदमय, अन्नमय, प्राणमय, मनोमय व विज्ञानमय) आहेत. त्यांची साधना करणे व अष्टांग योगाची पुर्तता करणे.

सर्वसामान्यतः योग म्हणजे आसन आणि प्राणायाम हेच प्रामुख्याने समजू या. कारण आपण सर्व कर्मयोगी आहोत. दैनंदिन जीवनाची पूर्तता करताना आपण सर्वांनी योग करायचा असतो. आपणा सगळ्यांना नारदमुनी आणि एक गरीब शेतकरी यांची गोष्ट माहितच असेल. संसारी जीवन जगून शेतकरी रोज न विसरता देवाची दोन वेळा उपासना करत असतो व नारदमुनी सातत्याने नारायणाचा उच्चार व जप करुन स्वतःला श्रेष्ठ भक्त समजतो. परंतू देवाला मात्र गरीब शेतकरीच खरा कर्मयोगी व श्रेष्ठ भक्त वाटतो. कारण सांसरिक जीवन जगून भक्ती योग करणे हे त्याला जमले होते. तर आपण सर्वांनी योगाचा आपल्या जीवनात अवलंब करून स्वास्थ्य लाभ घेणे ही सध्याच्या धकाधकीच्या जीवनाची गरज आहे व आवश्यकता आहे. मात्र योग सुरू करताना त्यांचे नियम जाणून घेणे व त्यांचा अवलंब करणे गरजेचे आहे. माझ्या विद्यार्थी मित्रांना हे सांगू इच्छितो की, योग केल्याने तुमच्या अभ्यासावर सुद्धा चांगला परिणाम होऊन तुम्ही परिक्षेत भरघोस यश मिळवु शकता. चला तर मग योग करूया कारण ''केल्याने होत आहे रे,आधी केलेची पाहिजे''. योग केल्यानेच आपल्याला त्याचा फायदा मिळणार. नुसते बघून किंवा योगावर व्याख्यान ऐकून किंवा वाचून न थांबता क्रियाशिल होणे करणे आवश्यक आहे.

**बीसेन सुकराम झिगार**
तृतीय वर्ष, विधी विद्यार्थी

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे. तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# मेंदू व मनाचे संशोधन *Science of Neurology*

## (२१ व्या शतकातील सर्वात मोठी वैज्ञानिक क्रांती)

'मेंदू व मनाचे संशोधन' या संदर्भात विज्ञानाची क्रांती कशी होत गेली याचा आढावा या लेखात घेतला आहे - संपादक

पुणे विद्यापीठाचे पदार्थ विज्ञान शास्त्राचे प्राध्यापक कै. डॉ. व्ही. जी. भिडे, यानी विज्ञानाची क्रांती कशी होत आहे याचा आढावा घेतला होता त्या आधारे संदर्भ डॉ. शरच्चंद्र गोखले - समाधानी वार्धक्य)

पहिल्या प्रथम कोपर निकस या शास्त्रज्ञाचा उल्लेख करावा लागेल. पूर्वीच्या काळीं आपली पृथ्वी ही एकूण अवकाशाच्या केंद्रबिंदू आहे असे मानले जाते. परंतू डॉक्टर कोपर्निकस यांच्या संशाधनानंतर पृथ्वी ही आवकाश धुळीमधील एक कण आणि तो सूर्याभोवती फिरतो आहे हा सिद्धांत मान्यता प्राप्त झाली.

यानंतर विज्ञानाच्या क्रांतीमध्ये पुढले पाऊल टाकले ते डॉक्टर डार्विन या शास्त्रज्ञाने. आपण व आपली मानवजात कोणी देवदूत किंवा यश, किन्नर यापासून नसून माकडापासून उत्क्रांत झालेली आहेत. आपण मानव केसाळ नसलेली माकडे आहोत.

तिसरी पायरी गाठली ती डॉक्टर सिग्मंड फ्रॉईड यांच्या शोधाने. त्यानी जागृतावस्था आणि स्वप्नावस्था या विषयींचे नवीन संशोधन मांडले. आपण जरी म्हणत असलो की आपल्या आयुष्याची जडणघडण आपणच करतो, तरी प्रत्यक्ष वास्तवात आपल्या जन्मापूर्वी आपल्यावर कोणते संस्कार, घरातून आपल्या वाढण्यापासून आपत्यास येणारे अनुभव आणि भोवतालचा समाज असे अनेक घटक आपल्यावर परिणाम करीत असतात, ह्याची जाणीवही आपल्याला नसते. आपल्या वागण्यातून ह्याचा परिणाम दिसत असतो.

आता २१ व्या शतकामध्ये आणखी एक वैज्ञानिक क्रांती होऊ घातलेली आहे. ती म्हणजे माणसाचा मेंदू आणि त्याचे मन हे काय आहे. मन कसे कसे चालते, मेंदू कसे काम करतो याचे संशोधन चालू आहे, या शास्त्राचा अभ्यास गेल्या २५-३० वर्षांमध्ये सरू झालेला आहे. आपला मेंदू कसे काम करतो याचे संशोधन चालू आहे. आपला मेंदू आहे तरी कसा, त्याची रचना कशी केली आहे, डोक्याच्या कवटीमध्ये तो कसा बसवलेला आहे, त्याच्यात काय आहे, त्याचा एक्स रे इत्यादी मायक्रोस्कोप इ. शक्तिमान यंत्रांद्वारे माहिती गोळा करून अभ्यास चालू आहे.

या शास्त्राला Science of Neurology (न्यूरोलॉजी शास्त्र) असे नाव आहे. या शास्त्राप्रमाणे मेंदू हा 'नर्व्ह सेल्स' (नर्व्ह पेशी) यानी व्यापून आहे. या सेल्स सुमारे शंभर दशलक्ष आहेत. या सेल्सना 'न्यूरॉन्स' असे म्हणतात. मेंदूच्या नर्व्हस सिस्टिम (Nerve system) चे ह्या मुलभूत भाग आहेत. प्रत्येक न्यूरॉन हा दुसऱ्या न्यूरॉनशी संपर्क करीत असतो. त्यामुळे माहितीचे, संवेदनांचे आदान-प्रदान होत असते. या हालचाली प्रचंड गतीने व लयींत अखंडपणे चालू असतात. आपल्या शरीरातील हालचाली, आपले विचार, भावना यांच्या विद्युत्‌लहरी मेंदूच्या न्यूरॉन्समध्ये सतत चालू असतात. मेंदूत होणारी जाणीव शब्दरुपाने आपणास स्थूलपणे भासते. परंतू माणसाचे सर्वात मोठे लक्षण म्हणजे चित्रे काढणे, कविता करणे, कल्पनाशक्तीने शिस्पे घडवणे. ही स्फूर्ती माणसाला कशी होते, येते आणि स्फूर्ती म्हणजे काय या सर्वांचा अभ्याससुद्धा Science of Neurology या शास्त्रात केला जातो.

मेंदू हा एक अवयव आहे. तो बघता येतो. ह्याचा एक्सरे, Microscope city scan या तंत्रांद्वारे माहिती गोळा करता येते. तो अभ्यास हे शास्त्र करते. परंतू माणसाच्या मनांत संशय, विश्वास, श्रद्धा, प्रेम या भावना कशा घडतात. आपण

(पृष्ठ क्र. ३० वर)

माणूस स्वतःहून चुकीचा वागत नाही, परिस्थिती त्याला तसे वागायला भाग पाडते. परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य ज्याच्याकडे असते तो जग जिंकण्याची जिद्द राखून पुढे जातो.

# अमिश त्रिपाठीच्या 'शिवा ट्रायलॉजी' च्या निमित्ताने ...

*अमिश त्रिपाठी 'शिवा ट्रायलॉजी' या कादंबऱ्यांनी विक्रीचे सर्व उच्चांक मोडत पुराणकथांना एका नव्या दृष्टीकोनातून पाहिले आहे. भारतीय पौराणिक वाङ्मयाच्या या नव्या अवताराचा लेखाजोखा - संपादक*

कुठल्याही पुस्तकाच्या दुकानात जा क्रॉसवर्ड असो की कुठल्याही मॉलमधील बुकस्टोअरमध्ये जा; अगदी एअरपोर्टवरील बुकस्टॉलवर देखील तुम्हाला अमिश त्रिपाठी, देवदत्त पटनायक, आनंद निलकांतन इत्यादी मायथॉलॉजिकल फिक्शन लिहिणारी नावं दिसतील. मागच्या वर्षात तर अमिशच्या शिवा ट्रायलॉजीच्या २.५ दशलक्ष प्रती संपल्या. मध्यंतरी चेतन भगतच्या आयआयटीमधील प्रेमप्रकरणांच्या कादंबऱ्या भारतीय वाचकांनी डोक्यावर घेतल्या. परंतु सध्या भारतीय पुराणकथा व मिथकांवरील कादंबऱ्यांची अक्षरशः चलती आहे. याचं अजून एक ताजं उदाहरण द्यायचं झालं तर मुंबई विद्यापीठातील Post Graduate Diploma in Comparative Mythology या पदविका अभ्यासक्रमाला होत असलेली गर्दी. विश्वातील सर्व प्राचीन संस्कृतींचा व त्यातील मिथकांचा तौलनिक अभ्यास हा या पदविका अभ्यासक्रमाचा उद्देश. चार ते पाच वर्षांपूर्वी या अभ्यासक्रमाला दहा ते बारा विद्यार्थी मिळत असत; तर आता ५० विद्यार्थ्यांचा आकडा पार झाल्यावर 'हाऊसफूल' (Housefull) अशी पाटी लावावी लागते असे केंद्रसंचालकांचं म्हणणं आहे. यामागे, एकूणच पुराणकथांना एका नव्या परिप्रेक्षात पाहिल्यामुळे व भारतीयांच्या संपन्न सांस्कृतिक वारशामुळे एक प्रकारचे कुतूहल आहे. या कादंबऱ्यांचा बाजारातील खप पाहिला तर अक्षरशः डोळे फिरतील. पूर्वी 'बेस्ट सेलर' हा टॅग मिळण्यासाठी १०,००० पुस्तकांच्या प्रती संपाव्या लागत असत. चेतन भगत आदी लेखकांनी ९० ते १०० रुपयांमध्ये पुस्तक उपलब्ध करून दिले व लेखनाची शैलीही सोपी केली. तसेच बाजारपेठेचे तंत्र अवगत झाल्यामुळे 'थ्री इडियटस्' व आलिया भट फेम 'टू स्टेटस्' हा चित्रपट चेतन भगतच्या कादंबऱ्यांवर आधारित होता. भारतीय इंग्रजी वा Indian English Fiction च्या दालनात यामुळे निःसंशय भर पडली.

मात्र अमीश त्रिपाठीच्या 'शिवा ट्रायलॉजी' या त्रिकुटाने सर्व विक्रम मोडीत काढले. कारण बाजारपेठेत ज्याप्रमाणे हॅरी पॉटरच्या पुस्तक मालिकांना यश मिळाले, त्याचा भारतीय अवतार म्हणावा इतक्या तुफान विक्रीचा उच्चांक अमिश त्रिपाठीच्या 'इमॉर्टल्स ऑफ मेलूहा', 'द सिक्रेट ऑफ द नागाज्' व 'द ओथ ऑफ वायूपुत्राज' या कादंबऱ्यांनी प्रस्थापित केला. चेतन भगतच्या तुलनेत या पुस्तकांचा आकार, पृष्ठसंख्या व किंमत यात जमीन अस्मानाचा फरक जाणवतो. अमिशची पुस्तके साधारणतः ३०० ते ४०० पृष्ठांची असतात व किंमतही २५० रुपये वगैरे असते. तात्पर्य, ग्रंथाचे साहित्यिक मूल्य व बाजारमूल्य यांचा सहसंबंध नसतो असे म्हणावे लागते.

'इम्मॉर्टल्स ऑफ मेलूहा' या पुस्तकाच्या प्रकाशनाची जी कथा अमिश सांगतो ती खरोखर वेगळी आहे. या पुस्तकाचा विषय भगवान शिव आणि पुराणकथांशी संबंधित असल्याने सुरुवातीला सर्वच प्रकाशकांनी या पुस्तकाला छापण्यास नकार दिला. चेतन भगतच्या आयआयटीतील प्रेमकथांच्या प्रमाणात ही महादेवाची पुराणकथा कोण वाचणार असा प्रश्न अमिशला विचारण्यात आला. मात्र नंतर या पुस्तकाचा विक्रमी खप पाहून प्रकाशकांची रांग लागली. आज अमिशचे वाचक करोडोंच्या संख्येत असतील. या वर्षाच्या शेवटी 'इम्मॉर्टल्स ऑफ मेलूहा' या पुस्तकावर 'शिवा' या नावाने चित्रपट काढण्याचे हक्क करण जोहर

या लब्ध प्रतिष्ठित दिग्दर्शकाने घेतले व अजय देवगण हा मुख्य भूमिकेत आहे.

एकूणच या कादंबऱ्यांचे औचित्य पाहिले असता भारतीयांची भूतकाळाची जाणीव, पुराणकथांबद्दलचे कुतूहल व समृद्ध वारसा असल्याचा अभिमान या गोष्टी कारणीभूत आहेत. प्रसिद्ध इंग्रजी टीकाकार पी. लाल यांच्या मते-

"Myth holds communities and races more strongly than language, territory and government. There is no secular substitute for myth -"

अर्थात, मिथक वा कथांमुळेच समाज व देश एकत्र सांधले जातात. भाषा, प्रदेश वा सरकार यांच्यापेक्षा जर समाजाची मिथके व कथा सारख्या असतील तर तो समाज अधिक एकसंध असतो. म्हणूनच पी. लाल त्यांच्या 'Myth and the Indian Writer in English' या लेखात म्हणतात की-

"No Indian writer, in English or any of the other Indian languages - should commit pen to paper until he has spent ten years of his adult life carefully pondering the Indian Classics, learning the Indian tradition and absorbing the Indian myth."

या टिपणांच्या प्रकाशात अमिश त्रिपाठीच्या तीनही कादंबऱ्या लखलखीत दिसतात. भगवान महादेवाच्या एका आगळ्या वेगळ्या कथेच्या निमित्ताने हे लेखन झाले आहे. आपल्या आजोबांकडून लहानपणी ऐकलेल्या कथांना पुढे आपल्या बँकींग क्षेत्रातल्या व्यस्त कामातून वेळ काढून अमिशने जे मूर्त स्वरूप दिले ते आजच्या पिढीला जास्त जवळचे वाटते.

'इम्मॉर्टल्स ऑफ मेलूहा' ही २०१० साली प्रकाशित झाली असून इसवी सन पूर्व १९०० बी. सी. हा कथेचा कालखंड आहे. Indus valley civilization वा हडप्पा महोंजोदडो या संस्कृतीच्या पाऊलखुणा स्पष्टपणे दिसतात. 'मेलूहा' हे असेच एक भारतीय राज्य आहे, तेथील लोक 'सोमरस' पिऊन अमर झाले आहेत. येथे 'अमर' चा अर्थ 'दीर्घकाळ निरामय जीवन जगणे'असा आहे. कादंबरीच्या सुरुवातीला शिवा हा तिबेटीयन आदिवासी तरुण मेलूहा येथील सूर्यवंशी राजांच्या आमंत्रणाला मान देण्यासाठी जातो. मेलूहन लोक हे चंद्रवंशी राजांच्या विरोधात युद्ध पुकारणार असतात. चंद्रवंशींना 'नागा' या जमातीचा पाठिंबा असतो. या दोन्ही राज्यांचा 'नीळकंठ' या मिथकावर विश्वास असतो. त्यांच्यामते निळकंठ नावाचा एक दैवी पुरुष येऊन सत्याची प्रतिष्ठापना करील. एका चमत्कृतीजन्य प्रसंगी शिवा जेंव्हा सोमरस पितो तेंव्हा त्यांचा कंठ (गळा) निळा पडतो व सूर्यवंशी राजा दक्षाला वाटते की हाच 'निळकंठ' आहे. मेलूहा राज्याचे नयनरम्य वर्णन अमिश त्रिपाठी करतो. हे राज्य म्हणजे नियम व धर्माचे पालन करणारे असून भगवान रामांनी घालून दिलेल्या आदर्शावर चालणारे आहे. दक्ष हा त्यांचा राजा आहे व चंद्रवंशींच्या सततच्या दहशतवादी हल्ल्यामुळे त्रस्त आहे. दक्षाला एक सुंदर मुलगी आहे. तिचं नाव 'सती'. शिवाला ती खूप आवडते व तो लग्नाचा प्रस्ताव ठेवतो. मात्र सती ही 'विकर्मा स्त्री' आहे म्हणून दक्ष नकार देतो. 'विकर्मा' हे एक नवे मिथक असून या स्त्रियांना लग्नाचा अधिकार नाही. पूर्व जन्मीची कर्मे वाईट असल्यामुळे या जन्मात पती मेल्यामुळे ती विधवा झाली व हत्तीचे मुख असलेला अपंग मुलगा (गणेश) झाल्यामुळे तिला 'विकर्मा' ठरवले आहे.

शिवा हा जुन्या रुढींविरुद्ध बंड करतो व 'निळकंठ' असल्यामुळे त्याला सर्व मानतात. तो सतीशी लग्न करतो. मंदार पर्वतावर 'सोमरस' निर्माण करणारा कारखाना आहे. या सोमरसामुळेच मेलूहन लोक दीर्घकाळ जगत असतात. या सोमरस निर्मितीत सरस्वती नदीचे पाणी वापरले जाते. अतिवापरामुळे सरस्वती नदीचे पाणी आटून नदीचे अस्तित्व धोक्यात येत असते. तेवढ्यात या कारखान्यावर एक दहशतवादी हल्ला होतो व या कामी 'बृहस्पती' नावाचा शास्त्रज्ञ बेपत्ता होतो. शिवाने या प्रसंगांनतर दक्षाच्या म्हणण्यानुसार चंद्रवंशी व नागांविरुद्ध युद्ध पुकारले

आहे. चंद्रवंशींची राजधानी 'स्वद्वीप वर शिवाचे आक्रमण होते व विजय प्राप्त होतो.

चंद्रवंशींना या गोष्टीचा राग येतो की नीळकंठ सूर्यवंशीच्या बाजूने युद्ध करतो आहे. चंद्रवंशी हे सूर्यवंशींना 'पापी', 'दुष्ट' ठरवतात, तर सूर्यवंशी हे चंद्रवंशींना वाईट ठरवतात. महादेवाला हा प्रश्न पडतो की नेमकं 'अयोग्य' कोण आहे. या कुतूहलातून तो 'द सिक्रेट ऑफ नागाज'. या पुढच्या कादंबरीत नागलोक नेमके कोण व खरेच ते वाईट आहेत का याचा शोध घेण्यास दंडकारण्यात जातो. 'पंचवटी' ही नागांची राजधानी असून 'काली' ही राणी आहे. काली व गणेश केवळ शरीराने विद्रूप व वैकल्यग्रस्त आहेत म्हणून दक्षाने त्यांना 'विकर्मी' ठरवून दूर फेकून दिले. याचा शोध घेताना शिवाची भेट बेपत्ता झालेल्या 'बृहस्पती' या शास्त्रज्ञाशी होते.

'सोमरस' निर्मितीमध्ये सरस्वती नदीचे अमाप पाणी वापरल्यामुळे ही नदी लुप्त होत आहे. तसेच या निर्मितीमध्ये जे टाकाऊ वा अविशिष्ट पदार्थ उरतात. ते त्सांगपो नदी (ब्रह्मपूत्रा) मध्ये टाकले जातात. या विषारी द्रव्यांमुळे नागा व भृंग या जमाती ज्या प्रांतात राहतात तिथे घातक रोग निर्माण झालेले आहेत. सोमरस निर्मितीमुळे नागांच्या नवजात शिशुंना दुर्धर आजार होऊन ते शरीराने विद्रूप होतात व सूर्यवंशी त्यांना 'विकर्मी' ठरवून पंचवटीत राहायला पाठवतात. म्हणूनच नागांनी सोमरस निर्मितीचा कारखाना असलेल्या मंदार पर्वतावर हल्ला केला होता. हे शिवाच्या लक्षात येते तेव्हा त्याचा 'असत्य', 'पाप' या संकल्पनांचा शोध संपतो. शिवाला 'वासुदेव' नावाच्या पंडितांपासून हे कळते की, 'पाप' वाढल्यास निळकंठ जन्माला येतो.

'ओथ ऑफ वायुपुत्राज' या शेवटच्या पुस्तकात अमिश युद्धाचे रोमांचक वर्णन करतो. ब्रह्मास्त्र, पशुपतास्त्र आदी शस्त्रांचा, शांती चर्चेचा व शिष्टाईचा बराच प्रयत्न करूनही 'दक्ष' ऐकत नाही हे पाहून शिवा परत मेलूहावर चाल करून जातो. 'महादेव' ही संकल्पना प्रत्येक युगाची वेगळी आहे. रुद्र या देवतेने भविष्यात पापाचा विनाश करण्यासाठी 'निळकंठ' घडवण्याची यंत्रणा विकसित केली असून, ती 'वायुपुत्रा' या समूहावर सोपवली आहे. वायुपूत्रांचा मुख्य 'मित्र' याची भेट शिवा घेतो व हा सोमरस निर्मितीचा उद्योग थांबवण्याची विनंती करतो.

शिवाला वायुपुत्रांकडून ब्रह्मास्त्रादी विदारक पाशुपतास्त्राचा वापर करावा असा सल्ला वायुपुत्रांचा अस्त्रांचा वापर टाळण्यासाठी कडक सूचना मिळते व केवळ मंत्रीगट देतो.

शिव आणि वायुपुत्रांची भेट ही नकाशात अफगाणिस्तानच्याही वर असलेल्या प्रदेशात होते. भारतवर्ष हे किती विस्तारलेले होते याची प्रचिती अमिश त्रिपाठीच्या पुस्तकात होते. 'युद्धस्य कथा रम्या।' असे म्हटलेच आहे. सती युद्धामध्ये धारातिर्थी पडते. क्रोधाने लाल झालेला महादेव दक्षाविरुद्ध पाशुपतास्त्राचा वापर करतो व मेलूहा येथील सूर्यवंशियांचा नायनाट करतो.

पुराणांमधील 'दक्षयज्ञाची' कथा व सतीच्या यज्ञातील उडी घेण्याची कथा अमिशने एका वेगळ्या व सध्याच्या काळाला उचित अशाप्रकारे सांगितली आहे. येथील महादेव हा कोणी देव न वाटता सूपरमॅन व Six Pack असलेला आहे. त्याच्या तोंडी बोजड तत्त्वज्ञानाऐवजी सोप्या इंग्रजी वाक्यांची रेलचेल असल्यामुळे या पीढीला तो जवळचा वाटतो. दहशतवादी हल्ल्यांचा उल्लेख 'नागा' या जमातीच्या अनुषंगाने होतो. तेव्हा पाकिस्तानातून नेहमी होणारे अतिरेकी हल्ले आठवतात.

महादेव, नीळकंठ व शिव ह्या देवता एका तिबेटी आदिवासी जमातीतून प्राप्त झाल्या हा एक वेगळा व हृद्य प्रवास अमिश त्रिपाठीच्या या ट्रायलॉजीतून घडतो. जोसेफ कॅम्पबेल या प्रख्यात अमेरिकी अभ्यासकाने म्हटले आहे, "Mythology touches a very deep chord of human mind." हे अमिश त्रिपाठींच्या या तीन कादंबऱ्या वाचल्या नंतर खरे वाटते.

**प्रा. प्रशांत पु.धर्माधिकारी**

इंग्रजी विभाग,

जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे

भ्रमणध्वनी-९४२२४९५०९४

# आंतरजातीय विवाह - समस्या?

*'आंतरजातीय विवाह समस्या' या विषयी लेखकाचा दृष्टिकोन या लेखात विशद केला आहे - संपादक*

संध्याकाळची दिवेलागणीची वेळ झाली. गोडसेंच्या कुटुंबातील सर्वजण देवघरातील पूजेच्या ठिकाणी एकत्र जमले. सौ. सुमित्राबाईंनी समईत तेल घातले, वाती नीट केल्या आणि काडेपेटीतील एक काडी काढून ती पेटवण्यापूर्वी एकदा सर्वांवरून नजर फिरविली. पतीराज यायला नेहमीच उशीर होत असे. दादरहून गोरेगावला लोकलने यायचे म्हणजे हे नेहमीचेच होते. पण चि. नितीन, त्याची पत्नी सौ. नीलिमा, आणि त्यांची दोन मुले - नातवंडे - चि. समीर आणि कु. तनुजा हात जोडून उभे होते. समीर आणि तनुजाची गडबड चालूच होती. सौ. नीलिमा त्यांना डोळ्यांनी दटावत होती.

काडी ओढून समईची वात लावताना सौ. सुमित्राबाईंच्या मनात आले की, दुसरा मुलगा - चि. गौतम - कसा आला नाही ! असेल कुठेतरी ट्रॅफिकमध्ये अडकला, असे म्हणून त्यांनी समीरला सांगीतले, 'हं समीर, म्हण.'

समीरने सुरू केले - 'शुभं करोती कल्याणम्, आरोग्यं धनसंपदा, शत्रुबुद्धी विनाशाय, दीपंज्योती नमोस्तुते।'

लागोपाठ तनुजानेही म्हणायला सुरूवात केली,
'दिव्या दिव्या दीपत्कार, कानी कुंडल गळा मोतीहार,
दिवा लावला देवापाशी, उजेड पडला तुळशीपाशी,
दिव्याला पाहून नमस्कार, घरच्या सर्वांना आयुष्य फार।
तिळाचे तेल कापसाची वात, दिवा जळू दे सारी रात ॥'

त्यानंतर दोघांनी मिळून आईची स्तुती म्हटली -
'आई माझा गुरू, आई कल्पतरू,
सौख्याचा सागरू, आई माझी।
प्रीतीचे सागर, अमृताची धार,
मांगल्याचे सार, आई माझी ॥'

मग सर्वांनी मिळून म्हटले - 'इडापिडा टळो, घरातली पीडा बाहेर जाऊ दे, बाहेरची लक्ष्मी घरात येऊ दे.'

चि. तनुजाने सर्वांच्या पाया पडायला सुरूवात केली. सर्वात पहिल्यांदा आजीच्या, मग वडिलांच्या, आईच्या आणि शेवटी समीरच्यापण! वयोमानाप्रमाणे ज्येष्ठताक्रम न चुकता पाळायची. नंतर समीरही सर्वांच्या पाया पडला. सौ. नीलिमानेही प्रथम सासूबाईंना व नंतर नवऱ्याला वाकून नमस्कार केला. चि. नितीन आईच्या पाया पडला. सौ. सुमित्राबाईंनी सर्वांना 'आयुष्मान भव' असा आशीर्वाद देत हातावर चमचाभर साखर ठेवली.

सर्वांनाच दादासाहेबांची अनुपस्थिती जाणवत होती. समीर व तनुजाने हात जोडले आणि 'दादासाहेबांना पाया पडू जाऊ देत' असा नमस्कार पाठवून दिला! गौतमकाकाची गैरहजेरी जाणवून त्यांनी 'गौतमकाकाच्या पाया पडू जाऊ देत' असा त्यालाही हवाई नमस्कार पाठवून दिला!

अर्ध्या तासानंतर फटफटीचा आवाज ऐकून दोघेही 'काका आला ऽऽ' करत दाराकडे पळाले. 'कौटिल्य अपार्टमेंटस'च्या पहिल्याच मजल्यावर गोडसेंचा फ्लॅट असल्याने, दार उघडून जिन्यावरून उतरून गेले सुद्धा.

इकडे गौतम मोटरसायकल पार्क करून, कुलूप लावून, हेल्मेट हातात घेऊन जिना चढत होताच. 'काकाऽऽ, काकाऽऽ' करत समीरने त्याच्या हातातले हेल्मेट घेतले. तनुजाने किल्ली घ्यायला हात पुढे केला

आणि एकदम मागे घेतला. गौतमच्या पाठीमागून कोणीतरी येत होते.

गौतमने तनुजाला उचलून कडेवर घेतले, चावी हातात दिली, आणि मागे वळून म्हणाला, 'स्टेफी, ये. ही माझी लाडकी पुतणी तनुजा. तो हेल्मेट घेऊन पुढे पळालाय तो पुतण्या समीर. ये, इथे पहिल्याच मजल्यावर आमचे घर आहे.'

जिना चढून सर्वजण घरी आले. बूट काढताना गौतमने आईला हाक दिली, 'आईगं, तुला भेटायला माझी मैत्रीण स्टेफी आलीय.'

स्टेफीने सँडल काढले. आत येऊन उभी राहिली.

'अगं स्टेफी, बैसना. गौतमची मैत्रीण आम्हाला काही परकी नाही. हं, अशी नीट बैस. अरे गौतम, सर्वांची ओळख करून दे आधी. पण थांब, मला सांग चहा घेतेस की कॉफी? काय आवड तुला?' सौ. सुमतीबाईंचे आदरातिथ्य दिसून आले. तशी स्टेफी थोडी सावरून बसली.

'आई, ही स्टेफी माझ्या शेजारच्या ऑफिसमधील मि. स्टीफनची सेक्रेटरी आहे. उत्तम स्टेनो आहे. रोज दुपारच्या टी टाईममध्ये आम्ही सगळेच एकत्र चहा घेतो. स्टेफीला चहा चालतो, फक्त दूध थोडे कमी असावे. साखर वेगळीच दे, हवी तेवढी घेईल ती. आणि बरकां स्टेफी, ही माझी आई - सौ. सुमित्रा; हा माझा मोठा भाऊ नितीन, ही माझी वहिनी सौ. नीलिमा; हा पुतण्या समीर आणि ही आमची लाडकी कुक्कुली बाळी तनुजा. माझे बाबा - दादासाहेब म्हणतो आम्ही त्यांना - ते येतील एव्हढ्यात. ते दादरला म्हात्रे कंपनीत सुपरिंटेंडंट आहेत. लोकलने यायला वेळ लागतो.'

स्टेफीने सुमित्राबाईंना वाकून नमस्कार केला. नितीन आणि सौ. नीलिमाने 'वाकू नको' असे सांगीतले म्हणून हात जोडून अभिवादन केले. पर्समधून कॅडबरी चॉकलेट काढून समीर आणि तनुजाला दिली, आणि म्हणाली, 'चलो, कुछ अच्छा हो जाय!' सगळे या समयसूचकतेवर हसले. तनुजाला ते का हसताहेत हे न कळल्यामुळे ती आईच्या मागे लपली.

वातावरण असे मोकळे झालेले पाहून सौ. सुमित्राबाई सुखावल्या. 'मी चहाचे बघते,' असे म्हणून त्या आत वळल्या. तोपर्यंत सौ. नीलिमाने स्वयंपाकघराचा कब्जा घेतला आणि गॅसवर चहाचे आधण ठेवले. मग सौ. सुमित्राबाई दिवाणखान्यातच थांबल्या. स्टेफीच्या शेजारी बसल्या आणि तिची विचारपूस करायला सुरुवात केली.

'स्टेफी, तुझ्या ऑफिसमध्ये आणखी कोणकोण आहे गं?'

'अहो आई, आमच्या ऑफिसमध्ये आम्ही तिघी सेक्रेटरी आणि चार क्लार्क आहोत. शिवाय आमचे साहेब मि. स्टीफन वॉर्न, त्यांचे असिस्टंट मि. थॉमस कुक आणि मॅनेजर मि. डॅनिएल वॉर्नर आहेत. आमची क्विंज अँड वॉर्न मल्टीनॅशनल कंपनी आहे. हे क्वॉर्टर न्यूयॉर्कला आहे. इंपोर्ट-एक्सपोर्टचा मोठा व्यवहार आहे. मी स्टेनो म्हणून गेली तीन वर्षे तिथे आहे.' स्टेफी मोकळेपणाने बोलत गेली.

'अग आई', गौतम मध्येच म्हणाला, 'दररोज दुपारी लंचला आणि नंतर चहाला हिचे साहेब, असिस्टंट आणि मॅनेजर सोडून आम्ही सगळे एकत्र असतो. माझ्या टिफीनमधले स्वादिष्ट पदार्थ खाऊन, स्टेफी एकदा म्हणाली, 'गौतम, तुझ्या घरी कधी नेतोस? आईंना भेटून या पदार्थांची रेसिपी माहीत करून घेईन.' आज म्हटलं, 'चल'. तिच्या घरी तिच्या मम्मीला फोन करून, 'उशीर होईल. गौतमच्या घरी आईला भेटायला जायचे आहे.' असे सांगितले आहे.

'मग असे कर स्टेफी, एखाद्या रविवारी तुझ्या मम्मीलाच घेऊन ये. बरं मला सांग, तुझ्या घरी कोणकोण आहे? काय करतात तुझे डॅडी?' सौ. सुमित्राबाई जणू वधुपरीक्षा घेत होत्या. स्टेफीसुद्धा मनमोकळेपणाने बोलत

होती. अधूनमधून तिची नजर गौतमकडे जायची. गौतम तिला डोळ्यांनीच खुणवित होता. जणू या प्रसंगाची त्यांची रंगीत तालीम झाली होती!

'माझे डॅडी किनई, भायखळ्याच्या स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेत ज्युनियर ऑफिसर आहेत. फॉरिन एक्सचेंजचे खाते आहे त्यांच्याकडे. सुट्टी, रजा त्यांना माहितच नाही. रात्रीसुद्धा उशीराच येतात घरी. इथे जवळच मालाडला आमचे घर, रहेजा अपार्टमेंटमध्ये आहे. माझी आई 'सेल्मा', घरीच असते. ती बी. ए. इंग्लिश आहे. पण नोकरी करत नाही. मला एक धाकटी बहीण आहे 'फॅनी'. सेंट थॉमस स्कूलमध्ये नववीत शिकतेय. माझे म्हणाल तर मीपण बी. ए. इंग्लिश आहे. स्टेनो-टायपिंगचा कोर्स केला आहे आणि मला लगेच नोकरी मिळालीय.'

तेवढ्यात सौ. नीलिमा चहाचा ट्रे घेऊन आली. स्टेफीने पुढे होऊन कप भरले, दूध - साखर घालून सौ. सुमित्राबाईंना दिला. 'अगं, अगं' म्हणत सौ. नीलिमा पुढे येईपर्यंत दुसरा कप तिच्यापुढे धरला. गौतम पाहातच होता. सारं काही आधी ठरल्याप्रमाणे चालले होते. त्याने आपल्यापुढे आलेला कप स्टेफीकडून घेतला, नितीनला दिला व दुसरा स्वत:ला घेतला. सगळ्यांना दोन दोन बिस्किटे देत म्हणाला, 'हॅव गुडडेज.' सगळे हसू लागले.

चहाचा कार्यक्रम संपवून स्टेफी निरोप घेत असतानाच समीर आणि तनुजा हातात छत्री घेऊन 'दादासाहेब आऽऽलेऽऽ' असे ओरडतच घरात घुसले. भिजलेली छत्री कोपऱ्यात उभी ठेवेपर्यंत श्री. गोडसे आलेच. घरात नवीन माणूस पाहून ते थबकलेच, पण 'मी आलोच कपडे चेंज करून', असे म्हणून बूट काढून आतल्या खोलीत गेले. आतूनच त्यांनी हाक दिली, 'अरे नितीन, माझी डायरी कुठाय?' काहीतरी निमित्त काढून त्याला आत बोलावून बाहेरच्या पाहुणीची माहिती काढून घ्यायची होती. नितीनही 'आलो दादा' म्हणत आत गेला.

दादासाहेबांनी नितीनला माहीत झालेली स्टेफीची हकीकत विचारून घेतली. दिसायला सुंदर, वागायला बोलायला सुसंस्कृत वाटणारी स्टेफी त्यांनाही आवडली होती. पण गौतमने काही प्रस्ताव मांडल्याशिवाय आणि सौ. सुमित्राशी चर्चा केल्याशिवाय ते काही मत देऊ शकत नव्हते. कपडे बदलून, नेहरूशर्ट, पायजमा पेहरून ते व नितीन एकदमच बाहेर आले. पुन्हा एकदा स्टेफीची ओळख गौतमने करून दिली. स्टेफीनेही उठून अदबीने दादासाहेबांना वाकून नमस्कार केला. दादासाहेबांचा चहा होईपर्यंत सगळी उजळणी झाली.

'फार उशीर झाला, मम्मी आणि डॅडी काळजी करत असतील. मी निघते' असे म्हणून स्टेफी जायला उठली. पुन्हा सर्वांना नमस्कार करून ती निघाली.

'आई, मी हिला कोपऱ्यापर्यंत सोडून येतो', म्हणत गौतमही उठला.

निरोप घेऊन बाहेर पडताना पुन्हा येण्याचे आणि रविवारी मम्मी, डॅडींना आणण्याचे आश्वासन देऊन स्टेफी बाहेर पडली. गौतम आणि स्टेफी लिफ्टने न जाता जिन्यानेच उतरत गेले. पहिले वळण घेतल्याबरोबर गौतमने स्टेफीचा हात हातात घेतला म्हणाला, 'अभिनंदन! तू आज जिंकलेस माझ्या आई-वडिलांना. आता पुढले तुझ्या मम्मी-डॅडींच्या हातात आहे.'

'हो गौतम, पण मला केवढे टेन्शन आले होते माहिताय? म्हटलं जमतेय की नाही. तरी बरं, गेले आठवडाभर आपण प्रॅक्टिस केली! बाकी तूं चांगला दिग्दर्शक आहेस. प्रत्येक मूव्ह व्यवस्थित बसवून घेतली होतीस. फक्त समीर आणि तनुजा काय बोलतील ते माहीत नव्हते. पण कॅडबरीवर खूष होते दोघे.' स्टेफी छोट्या रुमालाने घाम पुसत म्हणाली.

चालत चालत ते दोघे नाक्यापर्यंत आले. गौतमने टॅक्सी थांबवली आणि स्टेफीला निरोप दिला.

स्टेफीची ओळख झाल्यापासून गौतमने मनोमन तिला वरले होते. स्टेफीलाही गौतम आवडला होता. प्रश्न होता दोघांच्या धर्माचा. दोघांच्या घरून कट्टर विरोध होणार,

---

जीवनाच्या धकाधकीत खरोखर मोलाचे, जतन करून ठेवण्यासारखे जर काही असेल, तर ते माणसाचे सृजनशील, संवेदनशील, संवेदनाक्षम व्यक्तिमत्त्व होय.

मग कसे! दोघांनी अशा लग्नाचे फायदे - तोटे याचा विचार केला होता. अभ्यास केला होता. आजूबाजूच्या आंतरजातीय विवाह झालेल्या कुटुंबातील पती-पत्नींशी चर्चा केली होती. आणि त्यांनी आपला निर्णय पक्का केला. पळून जाऊन, घरच्यांच्या मनाविरुद्ध लग्न करायला स्टेफी तयार नव्हती. चर्चेने प्रश्न सुटतात यावर तिचा विश्वास होता. तिच्या मम्मी-डॅडीबरोबर तिने आधीच चर्चा केली होती. माहीत असलेली उदाहरणं दाखवून पटवून दिले होते.

घरी पोचल्यावर स्टेफीने ममीला आजच्या भेटीची सर्व हकीकत सांगीतली. गौतम घरी येऊन भेटून गेला होता. त्यांनाही तो आवडला होता. त्यांच्यापरीने त्यांनी नवऱ्याला पटवले होते. स्टेफी आणि गौतमची जोडी छान जमेल हे दोघांनाही मान्य होते. फक्त काळजी होती, गोडसे कुटुंबाला कसे राजी करायचे याची. लॉरेन्सनेनंतर लग्नाची व त्यानंतर त्या दोघांची स्वतंत्र राहण्याची व्यवस्थाही करून ठेवली होती. त्यांच्या भागातच बांधकाम सुरू असलेल्या एका अपार्टमेंटमध्ये एक टू बीएचके फ्लॅट बुक करून ठेवला होता.

पुढे आठवडाभर गौतम स्टेफीला निरनिराळे संस्कार शिकवत राहिला. तेही स्टेफीने आत्मसात केले. मुंबईतच लहानाची मोठी झाली असल्याने महाराष्ट्रीयन वेशभूषा, केशभूषा, दागदागिने यांचा सराव होताच. श्री. दादासाहेब गोडसे किंवा त्यांच्या कोणत्याही नातेवाईकाला शंका येणार नाही की ही मुलगी हिंदू नाही, अशी सर्व तयारी गौतमने करून घेतली होती. फक्त लॉरेन्स आणि सेल्मा यांनी स्टेफीसह गोडसेंच्या घरी जायचे आणि बोलणी करायची एवढेच राहिले होते.

आणि ठरल्याप्रमाणे रविवारी चर्चला जाऊन आल्यानंतर लॉरेन्सने श्री. गोडसेंना फोन केला, हॅलो, मि. दादासाहेब गोडसे आहेत का? मी मि. लॉरेन्स बॅप्टिस्ट बोलतो आहे. हो, द्या त्यांना.'

'नमस्कार, मी दादासाहेब गोडसे बोलतोय. बोला, मि. बॅप्टिस्ट. मी आपल्यासाठी काय करू शकतो?'

'गुड डे, मि. गोडसे. माझ्या मुलीने - मिस स्टेफीने - मला आपला निरोप दिला आहे. मला आणि माझ्या वाईफला - मिसेस सेल्मा- आपण आपल्या घरी येण्याचे इन्व्हिटेशन दिले आहे. आपल्याला डिस्टर्ब होत नसेल तर आज दुपारी साडेचार वाजता आपल्या घरी येऊ शकतो. विल इट बी ओके?'

'अहो श्री. बॅप्टिस्ट, आम्ही आमंत्रण दिले आहे. मग याना. त्यात डिस्टर्बचा प्रश्न येतो कोठे? यू आर वेलकम. आणि हो येताना सोबत कु. फॅनीलाही आणा बरं कां! नो फॉरमॅलिटी, प्लीज.'

ठरल्याप्रमाणे बरोबर साडेचार वाजता गोडसेंच्या दारावरची बेल वाजली. दारात बॅप्टिस्ट कुटुंब उभे होते. 'वेल कम', 'नमस्कार', 'याना आत', 'बसा हं' असे सोपस्कार झाले. श्री. गोडसे बघतच राहिले. मिसेस सेल्मा, कु. स्टेफी चक्क महाराष्ट्रीयन पद्धतीची साडी, हेअर स्टाईल, गजरा, कुंकू अशा वेशात आल्या होत्या. कु. फॅनीपण परकर-पोलके आणि लांब वेणीत गुलाबाचे फूल खोऊन आली होती. त्यांना कोणीही ख्रिश्चन म्हटले नसते.

सर्वजण दिवाणखान्यात बसले. मि. बॅप्टिस्टने चि. समीर आणि कु. तनुजासाठी आणलेली कॅडबरी दिली. ती घेऊन दोघेही 'थँक्यू' म्हणून बाहेर खेळायला सटकले. एकमेकांच्या ओळखीची उजळणी झाली.

थोड्या हवापाण्याच्या आणि बँक आणि म्हात्रे कंपनीसंबंधीच्या गप्पा झाल्या. चि. नितीन आणि गौतमच्या वागण्यात मोकळेपणा दिसत नव्हता. पण सौ. सुमित्राबाई, मिसेस सेल्मा लगेच रेसिपींची देवाण घेवाण करायला लागल्या. सौ. नीलिमाने मिस स्टेफी आणि मिस फॅनीशी नुकत्याच पाहिलेल्या टीव्ही सिरीयलच्या मालिकांसंदर्भात चर्चा सुरू केली. त्यात फॅनीला फारसे औत्सुक्य नव्हते. ती टेबलावरची जुनी कॉमिक्स पाहात बसली.

हळूहळू गप्पांची गाडी आंतरजातीय विवाहावर

आली. विवाहसंस्था का उदयाला आली याबद्दलचे समाजशास्त्रातले दाखले दादासाहेबांनी मांडले. तर ते मान्य करत मि. लॉरेन्सनी जीवशास्त्रातली उदाहरणं दिली. समाजशास्त्र आणि विज्ञान यामधली ती चर्चा बाकीचे ऐकत राहिले.

'समाजशास्त्राप्रमाणे विवाहसंस्था उदयाला येण्यामागचे मुख्य कारण म्हणजे स्थैर्य, सुरक्षा हे आहे. यातूनच एकाच धर्माचे, जातीचे स्त्रीपुरूष यांचे विवाहसंबंध जुळत राहिले. यामागे अनेक वर्षांची परंपरा आहे.' श्री. दादासाहेब.

'हे मलाही मान्य आहे. परंतु निसर्गात पाहिले तर आपल्या लक्षात येईल की, पिढ्यान्‌पिढ्या अंतर्गत विवाहामुळे पुढची पिढी कमकुवत होत जाते. आपण जरा जीवशास्त्राकडे वळू. आपले गुणधर्म जनुकांनी निश्चित केलेले असतात. हे जनुक गुणसूत्रांवर रचलेले असतात. प्रत्येक सजीवाच्या पेशीकेंद्रामध्ये गुणसूत्रांच्या जोड्या आहेत. म्हणून प्रत्येक जनुकाला जोडीदार आहे. जनुकांचे गुण समान असले तरी त्यापैकी काही गुणांचे प्रकटीकरण होते. काहीवेळा या जनुकांमध्ये बदल होतात आणि त्यामुळे पुढच्या पिढीत असे उत्परिवर्तित जनुक एकत्र आले तर जनुकीय विकृती निर्माण होतात. अशी उदाहरणं म्हणजे रंग, आंधळेपणा, हीमोफिलिया, थॅलेसेमिया या विकृती होत. बौद्धिकमांद्य हेही याचेच उदाहरण होय. काही जमातीत विवाह आप्तस्वकीयांमध्येच होतात. तेथे अशा विकृती प्रकर्षाने आढळतात.

'या उलट दोन विभिन्न जनुकीय संच एकत्र आल्यामुळे पुढच्या पिढीत 'हायब्री व्हिगर' आढळते. पालक पिढीपेक्षा पुढची पिढी अधिक बलवान, सुदृढ आणि परिसराशी जुळवून घेण्यास सक्षम असते.' मि. बॅप्टिस्टमधला शिक्षक जणू जागा झाला!

'प्राणी जगतात नर आणि मादी या दोनच जाती आहेत. तिथे नर अतिशय सुंदर असतो. मोराला लांब रंगीत पिसारा असतो, सिंहाला आयाळ असते. पक्ष्यांचे मिलन नृत्य पाहण्यासारखे असते. टीव्हीच्या डिस्कव्हरी, ॲनिमल प्लॅनेट, नॅशनल जियॉग्राफी चॅनेलवर ते दाखवतात. यामध्ये सर्वोत्तम नराची निवड करण्याचे स्वातंत्र्य मादीला असते. कोणत्या नराचे जनुक आपल्या अपत्यामध्ये उतरावेत हे तिने ठरवायचे असते!' मि. बॅप्टिस्ट पुढे सांगू लागले.

श्री. दादासाहेब गोडसेंना हे पटत होते. मागच्या वेळेला गौतमने मिस स्टेफीला घरी आणले होते, तेंव्हाच सौ. सुमित्राबाईंना ती आवडली होती. पण दादासाहेब तयार होतील का? याची त्यांना शंका होती. आठवडाभर त्या जमेल तेंव्हा दादासाहेबांसमोर स्टेफीचे कौतुक करत होत्या. एकदोनदा 'ती परधर्मीय नसती तर सून करून घेतली असती' असे म्हणाल्याही!

दिवाणखान्यात मि. लॉरेन्स आणि श्री. दादासाहेब यांच्या गप्पा रंगात आल्या होत्या. तिकडे स्वयंपाकघरामध्ये सौ. सुमित्राबाई मिसेस सेल्मांना रुचकर पदार्थांच्या रेसिपी शिकवत होत्या. त्यातला एक पदार्थ करण्यात गुंतल्या होत्या. गॅसवर शिजत असलेल्या त्या 'फ्लॉवर कबाब'चा खमंग वास दिवाणखान्यात दरवळला. त्या वासामुळे लॉरेन्स आणि दादासाहेबांच्या चर्चेत खंड पडला.

'बघ रे गौतम, आत स्वयंपाकघरात काय कट शिजतोय? आमच्या तोंडाला पाणी सुटलेय. तयार झाले असेल ते घेऊन ये.' असे दादासाहेब म्हणताहेत तोपर्यंत सौ. नीलिमा ट्रेमध्ये चार प्लेटस् घेऊन आलीच. प्रत्येकाला एकेक प्लेट दिली.

'वा! काय खमंग वास आहे हो! आणि रंगही किती छान दिसतोय. वर टोमॅटो सॉसमुळे रंगसंगतीपण मॅचिंग झालीय. सेल्मा, शिकून घेतेस ना? दादासाहेब, आमची स्टेफी या घरात मॅचिंग होईल. मी आजच तुम्हाला आमचे घर पाहायला यायचे आमंत्रण देतो. आंतरजातीय विवाहाचा हा आणखी एक फायदा आहे. दोन वेगळ्या समाजातील परंपरा, संकृती यांचे चांगले मिश्रण होते.'

तिकडे स्वयंपाकघरात सौ. नीलिमा स्टेफीकडे

सस्मित, मिस्किलपणे पाहात होती. ''अगं स्टेफी, परवा गौतमभाऊजींनी तुला आमच्या घरी आणले त्याचवेळी मला वाटलं होते. गौतमभाऊजींना मी चांगली ओळखते. साळसूदपणे म्हणाले कसे, 'स्टेफीला आईच्या हातचे पदार्थ आवडतात म्हणून तिला भेटून रेसिपी शिकायला येते म्हणाली. म्हणून घेऊन आलो.' आमचा प्रेमविवाह झाला नाही म्हणून काय आम्हाला प्रेम कशाशी खातात माहीत नाही होय! पण खरं सांगू का स्टेफी, तुझा आणि गौतमभाऊजींचा जोडा अगदी ज्युलिएट आणि बाजीरावासारखा शोभेल. तुमचे लग्न झाले की तुमचा संसार मांडायला मी नव्या फ्लॅटवर चांगली पंधरा दिवस राहायला येणार आहे. सर्वकाही शिकवीन तुला. अगदी लहान बहिणीची उणीव भरून काढणारी जाऊबाई मिळालीय मला.''

इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर मिसेस सेल्मा म्हणाल्या, 'ओह माय गॉड! किती वेळ गेला समजलेच नाही. आम्ही निघतो आता. तुम्ही पुढच्या आठवड्यात वेळ काढून आमच्या घरी या. नवीन फ्लॅटही दाखवते. जवळच आहे. तसे मि. लॉरेन्स फार फ्री आहेत. फारशा फॉरमॅलिटीज पाळत नाहीत. वी विल हॅव डिनर ॲट अवर प्लेस. तुम्हाला आवडेल. स्टेफीसुद्धा छान कुक करते बरं कां! स्टेफी, लॉरी, फॅनी - इटस टाईम वी मेक अ मूव.'

'टाटा' 'बाय' 'सी यू' झाल्यावर दादासाहेबांच्या शेजारी सगळे जमा झाले. बॅप्टिस्ट कुटुंबाविषयी त्यांचे मत समजावून घ्यायला सगळेच उत्सुक होते. उताविळ झाला होता तो गौतम, पण त्याने नीलिमावहिनींना पुढे केले.

'वहिनी, तू विचार ना दादासाहेबांना' अशी त्याने भुणभुण लावली होती. समीर आणि तनुजा खाली गेले होते स्टेफीआंटीला 'सी ऑफ' करायला. ते धावतच वर आले. समीरने चक्क गौतमकाकाला मिठी मारली आणि म्हणाला, 'काका, आम्हाला स्टेफीकाकी आवडली!'

दादासाहेब खळाळून हसले, म्हणाले, 'हे लहानपण किती निरागस असते. जातपात, धर्म, परंपरा यांचे अडथळे यांना माहितच नाहीत. समीर तुझ्याप्रमाणेच आम्हालाही तुझी स्टेफीकाकी आवडलीय. चला, आता जेवायला या. जेवताना अधिक बोलू.'

डायनिंग टेबलवर सर्वजण बसल्यावर दादासाहेब बोलू लागले. 'या मि. लॉरेन्सचा विचार चांगला आहे. जीवशास्त्राचे आधार घेऊन त्याने मला पटवून दिले की, आंतरजातीयच काय आंतरधर्मीय विवाह ही नैसर्गिक बाब आहे. यातून समस्या उद्भवण्याचे जनुकीय कारणच नाही. समस्या निर्माण होतात त्या वैयक्तिक 'इगो'मुळे. आजच्या जमान्यात या इगोतला 'इ' काढून टाकला की समस्या 'गो' होतात. गौतम तुझी निवड आम्हाला पसंत आहे. पुढच्याच रविवारी बॅप्टिस्टच्या घरी जाऊ तेंव्हा त्यांच्या स्टेफीला आम्ही रीतसर मागणी घालू. काय सुमित्रा, ठीक आहे ना? स्टेफी आणि तिची आई तुला आवडलीय हे माझ्या तेंव्हाच लक्षात आले. बायकांना काय आणि कोण आवडते हे आम्हा पुरूषांनाच समजते. अरे हो, नितीन आणि नीलिमा तुम्ही काही बोलला नाहीत. पण समीर आणि तनू यांनी पसंती जाहीर केल्यावर तुम्ही दोघेही त्यांच्यावर रागावला नाहीत त्यातच मी काय ते समजलो. सुमित्रा, आता शेवटी दहीभात घ्यायची वेळ आलीय. त्यावर थोडी साखर घाल म्हणजे शेवट गोड होईल.'

**- डॉ. राजा ढेपे**
निवृत्त प्राचार्य
'सारस',५अ, सुविद्यानगर,
विजापूर रोड,
सोलापूर-४१३००४
भ्रमणध्वनी-९८९०१०८३३५

•••

**'दिशा' संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

# योगायोगाच्या निमित्ताने...

*दिनांक २१ जूनला देशव्यापी पातळीवर योगदिन साजरा करण्यात आला. योगाचे महत्त्व विशद करणारा लेख,*
*- संपादक*

२१ जूनच्या दिवशी देशव्यापी पातळीवर उत्साहभरल्या वातावरणात साजऱ्या झालेल्या योगदिनाच्या निमित्ताने एकूणच सामाजिक आणि आरोग्य जाणिवांमध्ये कुठल्या प्रकारची भर पडणार आहे हे एका अर्थाने कोडेच म्हणावे लागेल. तरीही केंद्रस्तरावरून तसेच प्रशासकीय पातळीवरून अशा प्रकारचा एक सर्वव्यापी आणि अत्यंत वेगळा प्रयत्न होतो हे निश्चित.

भारतीय जनमानसाच्या दृष्टीने 'योगाचे' महत्त्व दोन प्रकारे सांगता येते. अत्यंत प्राचीन आणि गहन अशा भारतीय षड्दर्शनांमध्ये एक 'दर्शन' म्हणून योगाचे महत्त्व वादातीत आहे. न्याय-वैशेषिक आणि इतर दर्शनांच्या जोडीने योगदर्शनाचा विचार भारतीय तत्त्वज्ञानात केला जातो. निरिश्वरवादी, परंतु तरीही आस्तिक असणाऱ्या योगदर्शनाचे भारतीय तत्त्वज्ञानविचारात असलेले योगदान मोलाचे असून अनेक दार्शनिकांनी आणि तत्त्वज्ञांनी या दर्शनाचा यथायोग्य परामर्श घेतलेला दिसून येतो. विश्वातील मूलकण 'जीव-जगत् वाद' तसेच पृथ्वीवरील मानवी अस्तित्वाचे. चिंतन, 'आत्म'तत्त्वविषयी स्वतंत्र चिंतन या सर्व बाबी एक 'दर्शन' म्हणून 'योग' दर्शनाच्या अनुषंगाने विचारात घ्याव्या लागतात. याशिवाय अनुमान, प्रमाण आणि ज्ञानमीमांसेच्या क्षेत्रातही योगदर्शनाचे योगदान लक्षणीय आहे.

दुसरे म्हणजे, प्राचीन भारतीयांच्या आरोग्यविषयक जाणिवांची प्रागतिकतादेखील योगदर्शनाच्या माध्यमातून समजून घेता येऊ शकते. प्राणायाम, योगासने यांच्याच जोडीला आहारशास्त्र, शरीरनियमनशास्त्र यांचा विचारदेखील योग दर्शनाने केला असल्याचे दिसून येते.

अंतिम ध्येयाच्या प्राप्तीसाठी (मोक्ष) मानवी शरीराचे संयमन, नियमन व त्याचा प्रमाणबद्ध, आरोग्यपूर्ण विकास या सर्व घटकांचा विचार योगदर्शनाने केलेला असून, या सर्व घटकांचे अनुकरण प्रत्यक्ष जीवनात कसे करता येईल यासंबंधीचे मार्गदर्शनदेखील योगदर्शन करते. म्हणूनच श्रीमद्भगवद्गीतेनेदेखील योगदर्शनाची यथोचित दखल घेतल्याचा पुरावा देता येतो. इतर दर्शने, बाह्य जग व मानवी शरीराचे वैय्यर्थ अधोरेखित करत असताना योगशास्त्र व योगदर्शनाने मात्र मानवी शरीर व त्याचे मानवी जीवनातील वाटचालीच्या दृष्टीने असणारे दुर्दम्य महत्त्व वारंवार अधोरेखित केले आहे. याच कारणास्तव योगशास्त्र व त्यातील आहार-विहार पद्धतींचे अनुकरण भारतीय समाज हजारो वर्षांपासून करत आला आहे.

काळाच्या ओघात जीवनपद्धती बदलत गेली. मानवी आयुष्य अधिक वेगवान झाले आणि त्याबरोबरच प्राचीन योगविचाराने घालून दिलेली आहारविहाराची चौकट 'कालबाह्य' व 'अनुकरण्यास कठीण' म्हणून मोडीत निघाली. हा कदाचित पाश्चात्त्यिकरणाचा प्रभाव होता असेही म्हणता येईल. कालांतराने या वेगवान जीवनशैलीचे दुष्परिणाम मानवी जीवनावर व एकूणच समाजावर आघात करताना दिसू लागले. आरोग्यपूर्ण व निरामय जीवनासाठी काय करावे अशा प्रकारची संभ्रमावस्था समाजात निर्माण झाली आणि योगविचार काळाच्या ओघात मागे पडला. योगशास्त्राला पर्याय म्हणून इतर साधने पुढे आली आणि कालौघात विरलीसुद्धा. परंतु चिरंतन व शाश्वत असा योगविचार छोट्याशा पणतीप्रमाणे का होईना, पण आजही समाजजीवनाला दिग्दर्शन करतो आहे. भले, मागच्या

अनेक दोषारोप सहन करून शेवटी 'सत्य' विजयी होते.

काळातील योगशास्त्राचे 'योगा' (Yoga) असे इंग्रजीकरण झाले असेल. सामूहिकरित्या लोकांना योगपद्धती शिकवावी लागत असेल किंवा योगशिक्षकांना त्याच्या प्रसारासाठी श्रम घ्यावे लागत असतील, तरीही योगशास्त्राच्या द्रष्टेपणामुळे व मुळातच भारतीय परंपरेने 'योगः कर्मसु कौशलम्' अशी व्याख्या मान्य केलेली असल्याने योगविचार हा जीवनशैलीपासून वा कार्यशैलीपासून विमुक्त करता येणे अशक्य आहे आणि यातच त्याचे श्रेष्ठत्व सिद्ध होते.

आता थोडेसे २१ जूनच्या आंतरराष्ट्रीय योगदिनाच्या निमित्ताने. थेट केंद्रपातळीवरून योगशास्त्रासारख्या पारंपरिक आणि प्राचीन भारतीय विचाराची जाहीर पाठराखण होण्याची ही कदाचित पहिलीच वेळ. त्यामुळेच कदाचित देशपातळीवर या उपक्रमाची वारेमाप चर्चा होताना दिसते. या उपक्रमातून नेमके काय साध्य होणार व याचा नेमका हेतू काय असून, कुठल्या औचित्याने हे घडवून आणले जात आहे याविषयी एकूणतःच औत्सुक्य व नावीन्य समाजात उमटताना दिसते आहे. या उपक्रमाचे दृश्य परिणाम २१ जून नंतर दिसतीलच. परंतु त्यासंबंधाने आजघडीला मात्र विविध तर्कवितर्कांना उधाण आले आहे. प्रतिगामी विरुद्ध पुरोगामी, धर्मनिरपेक्ष विरुद्ध धर्मसमर्थक, हिंदुत्ववादी विरुद्ध अहिंदुत्ववादी, डावे विरुद्ध उजवे अशा सर्वच प्रकारच्या वैचारिक आघाड्या या वादात उतरल्या असून, प्रत्येक जण यासंबंधाने वैचारिक मांडणी करताना दिसतो आहे. देशाच्या सर्वोच्चपदी विराजमान असणाऱ्या व्यक्तीकडून प्राचीन भारतीय विचारांचे, हिंदुत्ववादी विचारांचे पुनस्थीपन करण्याचा हा जाहीर प्रयत्न आहे असा युक्तिवाद या प्रसंगाने केला जातो आहे. परंतु मुळात योगविचाराचा प्रसार व भगवीकरण, हिंदुत्वीकरण यांचा काय संबंध असाही प्रश्न उपस्थित करता येईल! पण ते असो.

**प्रा. अपर्णा कुलकर्णी-धर्माधिकारी**
सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग,
सेंट झेवियर्स कॉलेज, मुंबई.

(पृष्ठ क्र.१९ वरून **मेंदू व मनाचे संशोधन** Science of Neurology)

म्हणतो की माझ्या मनांत आले म्हणून मी असे केले, असा वागलो, परंतू मन काही दिसत नाही. मन म्हणजे काय शक्ती आहे, की एक प्रक्रीया आहे? याचाही नीटसा उलगडा आपल्याला झालेला नाही. एक मात्र खरे की, मन हे अत्यंत शक्तिशाली आहे, मानवी जीवनातील व्यवहाराचे महत्त्वाचे साधन आहे. मनाचा विचार करू लागले की पहिली गोष्ट जाणवते ती अशी की, मनाला आकाराचे बंधन (लांबी, रुंदी, जाडी बंधन) नाही. मनाला डोळे नसतात, पण डोंगरांचा विचार केला, की डोंगरांची रांग डोळ्यासमोर उभी राहते. म्हणजे मनाला डोळे नसतात. पण मनःचक्षू असे म्हणतो. या मनाला अंतराचेही बंधन नाही. आपण असे म्हणतो कीं माझा भाऊ न्यूयॉर्कला आहे, तर न्यूयॉर्कमधील भावाचे चित्र डोळ्यांपुढे उभे राहते. इतक्या वेगाने मनाची शक्ती, कितीही अंतर कापून आपल्याला नेऊ शकते. ही मनाची प्रक्रिया कशी चालते? माणूस मेला म्हणजे Brain Dead इतका तर या मनाचा व मेंदूचा काय संबंध आहे? न्यूरॉन्समधून इलेक्ट्रीक करंट निघतात. त्या न्यूरॉन्सचे कार्य कसे चालते? मनाचे रोग, शरीराचे रोग न्यूरॉन्स कसा काय संबंध आहे? या सगळ्याचा अभ्यास मेंदू, मन-विज्ञान, Science & Neurlogy मध्ये चालतो. हा अभ्यास २१ व्या शतकांचे आहे. ह्याचा अभ्यास गंभीरपणे चालू आहे. मेंदू, मन यामध्ये असणारी चित्शक्ती, चैतन्य याचाही अभ्यास (अध्यात्माचा अभ्यास) या शास्त्रात केला जात आहे.

प्रसिद्ध लेखक सी. पी. स्नो यांच्या मते जगात दोन संस्कृती नांदत आहेत. विज्ञानाची संस्कृती एका बाजूला आणि तत्त्वज्ञान, समाजशास्त्र दुसऱ्या बाजूला. या दोन संस्कृती एकाच वेळी जगात दिसत आहेत. ज्या दिवशी आपल्याला मेंदू, मन, चैतन्य याचा अभ्यास बोध होईल त्यावेळेस या दोन संस्कृतींमध्ये पूल बांधल्यासारखे होईल.

विज्ञान, चैतन्यांत. ऊडी घेऊन न्हाऊन निघेल कां? तर मग जग कसे असेल? ही आहे सर्वांत मोठी वैज्ञानिक क्रांती.

**प्रा. ह. श्री. परांजपे**
ग्रंथपाल (निवृत्त), बेडेकर कॉलेज, ठाणे

# मी जवळून पाहिलेले दयानन्द

विप्रमचे माजी अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांनी १९६९ साली गोव्याचे माजी मुख्यमंत्री दयानंद बांदोडकर यांची भेट घेतली. त्यांनी बांदोडकर यांच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू या लेखात विशद केले आहेत - संपादक

सन १९६९ च्या मार्च महिन्यातला एक रविवार तारीख दिनांक नक्की आठवत नाही. माझे एक मित्र गुणाकर जोशी यांचे समवेत सकाळी ९ वाजता पणजीच्या अस्तीनो भागातील भाऊसाहेब बांदोडकर यांच्या निवासस्थानासमोर मी उभा होतो. बाहेर गस्तीवर उभ्या असलेल्या पहारेकऱ्याने आम्हांस अदबीने चौकशी करून मग आत सोडले. एका मुख्यमंत्र्याच्या घरी आपण जात आहोत या विचारानेच मी थोडा विचलित मनस्थितीत होतो. खाजगी चिटणीसाने आम्ही आत आल्याची वर्दी भाऊसाहेबांस दिली आणि आत बोलावल्यावर आम्हांस आत सोडले. प्रति नमस्कार करून हसतमुखाने 'बसा' म्हणणाऱ्या भाऊसाहेबांकडे पाहून माझ्या मनातली भीती साफ दूर झाली आणि मी शांत मनाने आमच्या येण्याचे प्रयोजन सांगण्यास सुरुवात केली. बोलणे चालू असताना 'तुमचा सकाळचा चहा झाला नसेल' असे सांगून आम्हांस आग्रहाने चहा-नाष्टा देण्यास भाऊसाहेब विसरले नाहीत. आम्ही का आलो आहोत ते ऐकून घेऊन आणि प्रारंभिक विचारपूस झाल्यानंतर, 'मी स्नान, देवपूजा करून अर्ध्या, पाऊण तासाने बाहेर येईन. तोपर्यंत आपण बाहेर बसा. देवीचा जसा आदेश असेल तसे घडेल' असे सांगून भाऊसाहेब स्नानगृहाकडे वळले. कोणतेही महत्त्वाचे काम करताना अंतिम धोरण ठरवायचे असा भाऊसाहेबांचा शिरस्ता आहे. भाऊसाहेबांचा परमेश्वरी सत्तेवर दृढ श्रद्धा आहे आणि मानवी कर्तृत्वाला दैवी सहाय्य असणे ही आवश्यक आणि भाग्याची गोष्ट आहे असे ते मानतात. ठाण्यातील बाळकृष्ण नाईक-बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील कोनशिला समारंभ झाला त्यावेळी त्यांनी एकाग्रचित्ताने हात जोडून केलेली मूक प्रार्थना आणि वास्तू देवतेस केलेला साष्टांग प्रणिपात ज्यांनी पाहिला त्यांना भाऊसाहेबांच्या ईश्वरी अस्तित्वावरील दृढ श्रद्धेचे आणि महत्त्वाचे प्रसंगी ईश-स्मरण करण्याच्या सवयीचे प्रात्यक्षिक पाहावयास मिळाले.

जनतेने बहुमताने निवडून दिलेले म्हणून ते लोकनियुक्त भारतातील एका राज्याचे मुख्य प्रधान तर आहेतच, पण त्याहूनही ते त्या राज्यांतील जनतेचे अनभिषिक्त राजेच आहेत! त्यांच्या घरी भरलेला एक दरबारच मला पाहावयास मिळाला आणि म्हणूनच मी त्यांस 'जनतेचे अनभिषिक्तराजे' असे म्हटले! 'रविवार १९६९. सुटीचा दिवस' मी कामानिमित्त भाऊसाहेबांचे घरी सकाळी ९॥ वाजता पोहोचलो. बैठकीची खोली, बाहेरील वेटिंग हॉल आणि घराबाहेरील मोकळी जागा भेटावयास आलेल्यांनी गजबजून गेली होती. मी आल्याचे कळवून सरळ बैठकीच्या खोलीत जाऊन भाऊसाहेबांना नमस्कार केला. मला आपल्या जवळील कोचावर बसायला सांगून त्यांनी आपले काम पुढे चालू केले. ९॥ ते १२॥ पर्यंत शिस्तबद्ध पद्धतीने तिथे चाललेले कामकाज पाहून मला वाचलेल्या इतिहासकालीन प्रजादक्ष राजांच्या दरबारी वर्णनाचे प्रात्यक्षिकच पाहायला मिळाले आहे असे वाटले. खाजगी चिटणीस आलेल्या एकाएकाला अनुक्रमाने आत सोडीत होता. आलेली व्यक्ती अदबीने भाऊसाहेबांचे समोर नतमस्तक होत होती. तर काहींना आपल्या पायाला हात लावण्यापासून भाऊसाहेबांना परावृत्त करावे लागत होते. दरएक व्यक्ती आपल्यावर वा आपल्या बाजूवर होणाऱ्या अन्यायाचे गाऱ्हाणे

आपल्यापरीने भाऊसाहेबांस सांगत होती. हकिकत सांगताना कोणी घाबरत वा चाचरत असेल तर त्यास 'घाबरू नकोस काय असेल ते खरे आणि शांत मनाने सांग,' असे भाऊसाहेब त्या व्यक्तीस समजावीत असत. भेटायला आलेल्यांमध्ये सर्वप्रकारेचे लोक होते. जमीन विषयक झालेले अन्याय, पोलिसांकडून झालेल्या मारहाणीचे कथन, भर्तृकेवर केलेली जुलूम जबरदस्ती, कामधंदा नसल्याने होणारी उपासमार, गावांतील दोन तटांमुळे होणारी दंगल, पीक-पाणी चांगले न आल्यामुळे सारा भरणित सूट मिळावी म्हणून केला जाणारा अर्ज, सरकारी हॉस्पिटलमध्ये लवकर प्रवेश न मिळाल्याची तक्रार अशा नाना प्रकारच्या कैफियती समाजाच्या सर्व थरांतून आल्या होत्या. तक्रार ऐकून घेऊन त्यांतील खरेखोटेपणा अजमावण्याचे काम भाऊसाहेब मोठ्या कौशल्याने करीत होते. 'आधी तू अमूक वाजता, अमूक ठिकाणी' अमक्या आधिकाऱ्याला भेट आणि मग माझेकडे ये; तू सांगतोस ते बरोबर नाही, मी या प्रकरणाची पूर्ण चौकशी केली आहे. माझ्यासमोर लपवाछपवी चालणार नाही; 'तुमची तक्रार योग्य आहे, उद्या तुम्ही सचिवालयात बरोबर अमूक वाजता भेटा', अशा प्रकारच्या सूचना ते संबंधितांना व खाजगी चिटणीसांना नोंद करण्यासाठी देत होते. या दरबारांतील कामकाज विनाविलंब आणि न्याय निमूटपणे चालले होते. खोटे परतावे पसहाणाऱ्या एका व्यक्तीस पुराव्यानिशी निरुत्तर केल्यावर, ''मी चुकलो पाया पडतो, माफ करा.'' असे म्हणून ती व्यक्ती लोटांगण घालीत असता ''तुला इथे क्षमा होणार नाही. तू गावी परत जाऊन ...ला भेट आणि त्यांच्या पाया पड. तोच तुला क्षमा करील. ऊठ माझ्यासमोर उभासुद्धा राहू नकोस.'' असे म्हणून भाऊसाहेबांनी त्या व्यक्तीस सरळ बाहेर जाण्यास सांगितले. हा दरबार साधारण १२॥ वाजता संपला. तत्पूर्वी बाहेरील खोलीत एक विधवा बाई एका कोपऱ्यात बसलेली होती. ''सिद्धार्थ १०० रु. यांना आणून दे.'' म्हणून भाऊसाहेबांनी आपल्या मुलाला सांगितले. ''मुलांबाळांची आबाळ करू नको, त्यांना नीट खाऊपिऊ घाल. मोठ्या मुलाला माझ्याकडे पाठव, मग कामधंद्याचे पाहीन.'' असे आश्वासन त्या दुःखितेस देऊन भाऊसाहेब बाहेर जाण्यासाठी उठले.

रविवार दि....१९६९. निकडीच्या कामासाठी मी व गुणाकर जोशी विमानाने स. ८ ला विमानतळावर उतरलो. भाऊसाहेब बाहेर जाण्यापूर्वी त्यांना भेटावे म्हणून स्पेशल टॅक्सी करून पणजीला त्यांचे निवास स्थानी अल्विनोला ९ वाजता पोहोचलो. सकाळी ७ वाजताच भाऊसाहेब बाहेर गेल्याचे समजले. नवीन 'हॉलिडे सेंटर' कुठे कुठे निर्माण करता येतील त्याची पाहाणी करण्यासाठी ते .... जंगलात गेले असून सायंकाळी परतणार असल्याचे समजले. भाऊसाहेबांची गाठभेट घेऊन सायंकाळच्या विमानाने परत मुंबईला येणे आवश्यक असल्याने आम्हीही जंगलाकडे जाण्याचे ठरविले. हे जंगल ज्या डोंगरावर आहे त्याच्या पायथ्यापर्यंत आम्ही तातडीने टॅक्सीने पोहोचलो. तेथे श्री. उजगांवकर यांच्या घरी चौकशीकरता कळले की, भाऊसाहेब सुमारे १ तासापूर्वी जंगल पायवाटेने त्या जंगलाची पाहाणी करण्यासाठी डोंगर चढून गेले आणि दुपारी ११-११॥ वाजेपर्यंत ते बोंडला फार्म या ठिकाणी पोहोचतील. तेथून पुढची पाहाणी करण्यासाठी ते १ वाजता निघतील. चौकशी करता ''तुम्ही त्या पायवाटेने जाण्याचा प्रयत्न करू नका, अत्यंत दुर्गम आहे. तुम्हाला ते जमणार नाही.'' असे आम्हास सांगण्यात आले. पुढे काय करावे या विचारांत असताना आमच्या सुदैवाने दुपारी १ नंतर ज्या स्टेशन वॅगनमधून पुढची पाहाणी व्हायची होती ती गाडी पेट्रोल, पाणी वगैरे भरण्यासाठी आलेली आम्ही पाहिली. श्री. उजगांवकरांनी (सध्याचे मंत्री उजगांवकर यांचे बंधू) या स्टेशन वेगनमधून बोंडला फार्मपर्यंत जाण्याची आमची व्यवस्था केली.

बोंडला फार्म हा सर्व बाजूंनी घनदाट जंगल व डोंगरांनी वेढलेला, लहानसा सपाट भूप्रदेश आहे. या

ठिकाणी जाणारी पायवाट निबिड जंगलांतून आणि डोंगरदरीतून कशीबशी काढलेली आहे. येथे गोड्या पाण्याची मुबलकता असून येथे सरकारी कॅटल फार्म आहे. फार्मवरील अधिकाऱ्याने सांगितले कि येथे महिना महिना बाहेरून येणाऱ्या माणसाचे दर्शनही होत नाही. येथील आदिवासी सर्व प्रकारच्या कामात मजूर म्हणून काम करतात. हे आदिवासी भाऊसाहेबांना देवाप्रमाणे मानतात.

आम्ही पोहोचल्यानंतर थोड्याच वेळात मा. भाऊसाहेब, चि. सिद्धार्थ आणि एक आदिवासी पायवाटेने या फार्मवर पोहोचले. आम्हाला पाहून भाऊसाहेबांनी आनंदाश्चर्य व्यक्त केले. लगेच त्यांनी आजूबाजूच्या परिसरात पुरातनकाळच्या मूर्ती सापडल्या आहेत. त्या आम्हांस दाखविल्या. त्यांची माहिती सांगितली. बोंडला फार्म व बोंडलयाच्या डोंगरावर परदेशांतून येणाऱ्या प्रवाशांसाठी हॉलिडे कॅम्पस तयार करणे कसे शक्य आहे याची चर्चा केली.

या ठिकाणी चकमकीने विस्तव पेटवून स्वयंपाक करण्याची सिद्धता झाली व तासाभरांत भात आणि कालवण तयार झाले. बोंडल्यास केलेल्या वनभोजनाच्या आठवणीने आजही माझ्या जिभेला आणि तोंडाला पाणी सुटू शकते इतके ते रुचकर होते.

यानंतरच्या प्रवासात जीप वॅगनमधून १ वाजता सुरुवात झाली. हा प्रवास मी कालत्रयी विसरणे शक्य नाही. अत्यंत दुर्गम, खडकाळ, वळणावळणाच्या मार्गाने, पावसाळी ओहोळांतून, दगडधोड्यांवरून ड्रायव्हर मोठ्या कौशल्याने गाडी चालवीत होता. पावसाने आडवी पडलेली झाडे कुऱ्हाडीने तोडून बरोबरचे दोन गडी दूर करीत होते. डोंगरावरून कच्च्या वाटेने उतरताना काही ठिकाणी जिवाचा थरकाप होत होता. गाडी जर स्लिप झाली तर उलटण्याची वा खाली दरीत पडण्याची शक्यता मनात येऊन भितीने अंगावर काटा उभा राहात होता. पण भाऊसाहेब मात्र निश्चित मनाने गप्पा मारीत होते. या प्रवासांतील धोका त्यांना यत्किंचितही जाणवत नव्हता. परदेशी प्रवाशांसाठी कुठे व कशी घरे बांधावीत, तेथे काय काय सोयी असाव्यात या योजनेने परदेशी चलन कसेकसे उपलब्ध होऊ शकेल या संबंधी चर्चा करण्यात ते दंग होते. भितीचा लवलेशही त्यांना स्पर्श करू शकत नव्हता. या डोंगराची आणि आजूबाजूच्या प्रदेशाची खडान्खडा माहिती आपणास आहे आणि लहानपणापासून या प्रदेशांत रात्रीबेरात्रीही आपण हिंडलो आहोत असे त्यांनी सांगितले!!

रविवार दि. १९ जानेवारी १९७० सायंकाळी ४ वाजता भाऊसाहेबांनी ''चला डॉक्टर आपल्याला एका खेडेगावी एक रोगी बघायला जायचे आहे'' असे सांगितले. नव्या घेतलेल्या शॉवर लेट गाडीत मला बसविले. पणजीपासून ३० मैलांवर समुद्र किनारी असलेल्या खेडेगावी एका गरीब शेतकरी कुटुंबातील एक मुलगा काविळीने आसन्न मरण होता. मुलाच्या बापाने, ''भाऊ तुम्ही एकदा मुलाला बघा आणि तुमचे औषध त्याला द्या,'' असे विनवून सांगितले होते. मोटार रस्त्यावर उभी करून सुमारे अर्धामैल चालत आम्ही या शेतकऱ्याच्या घरी पोहोचलो. भाऊ आज येणार याची कोणालाच कल्पना नव्हती. तरीही ते आल्याचे समजताच सर्व गाव पाच-दहा मिनिटांत तेथे गोळा झाला. काळोख्या खोलीत रॉकेलच्या चिमणच्या प्रकाशांत त्या तरुण मुलाचा अस्थिपंजर देह पाहून सतत आणि अगणित रोगी पाहून निर्ढावलेले माझे मनही गहिवरले. त्या मुलाच्या अंगावर हात फिरवून त्याला दिलासा देऊन मग 'डॉक्टर याला तपासा' म्हणून भाऊंनी मला सांगितले. मुलाच्या बापाला औषधपाणी आणि खाणेपिणे यांची व्यवस्था सांगून व त्यासंबंधी आर्थिक सहाय्य देऊन मगच भाऊ मोटारीकडे परतले.

भाऊसाहेब अनेकवेळा भाजीमार्केटमध्ये जाऊन

स्वतः भाजी खरेदी करतात. अशाच एकावेळी त्यांच्या बरोबर पायी बाजारात हिंडत होतो. ज्या दुकानासमोर थांबावे तेथे अनेक लहान-थोर ओळखीचे त्यांच्या सभोवार गोळा होत. ''भाऊ आज कुठे निघालास?'' म्हणून वयस्कर माणसे त्यांना अदबीने विचारून नमस्कार करून चारदोन शब्द बोलून मगच पुढे जात. तरुण मुलांच्या खांद्यावर थाप मारून 'तू मुंबईहून कधी आलास? नोकरी ठीक आहे ना? वडिलांची तब्बेत बरी आहे का?' वगैरे घरची चौकशी करीत. ८-१० वर्षांची मुलेही त्यांच्या सभोवार जमून त्यांच्या भाषाबोलीत नमस्कार करून आजूबाजूला रेंगाळत. ज्या दुकानासमोर भाऊ थांबतील त्या दुकानात १०-२० रुपयांची खरेदी झटकन व्हायची. जवळ उभ्या असणाऱ्या नोकराला, सर्व सामान हातात व पिशवीत सांभाळणे कठीणच व्हायचे. आजूबाजूच्या मुलांना पुड्यांत खाऊ वाटला जायचा आणि ३०-४० मिनिटांत सभोवार जमलेल्या घोळक्यांतून वाट काढीत भाऊंची खरेदी आटपायची. हा सर्व घोळका मोटारीपर्यंत यायचा आणि मोटार सुरू होऊन दूर जाईपर्यंत मागे वळून पाहावे तर जो तो जनसमुदाय मोटार दिसते आहे तोपर्यंत तेथेच थबकून राहिलेला दिसायचा.

दोना पावला समुद्र किनारी नारळाच्या झाडाखाली खूर्ची टाकून सकाळी १० वाजता एकदा भाऊं समवेत बसलो होतो. समोर पसरलेला नितांत मनोहर समुद्र किनारा, नारळीचे दाट झाडीने हिरवागार आणि अतिरम्य, नवागतांच्या वृत्ती उल्हसित करणारा, रसिक वृत्तींना-कवी मनाला मोहून टाकणारा, भारून टाकणारा असाच भासला होता. समुद्राच्या खळाळणाऱ्या लाटा या पुण्यभूच्या चरणांना स्पर्श करून दूर दूर जात होत्या. क्षितिजापर्यंत पसरलेल्या अथांग सागराकडे पाहून ''पहा गोव्याचा दर्या किनारा किती सुंदर, किती प्रसन्न आहे तो! मुंबईचे अनेक जुहू येथे सामावलेला. हवाई बेटांच्या सौंदर्याची वर्णने तुम्ही वाचली असाल, पण जवळच असलेला हा स्वर्गीय सुंदर पणजीचा किनारा अनेकांना अज्ञात राहतो. याला काय म्हणावे?'' असे सखेदोद्गार त्यांनी काढले आणि मग आधुनिक यंत्र-सामुग्री आणून फार मोठ्या प्रमाणावर सहकारी मच्छीमारीचा धंदा लाखो रुपये भांडवल उभारून या ठिकाणी सुरू करण्याच्या आपल्या योजना त्यांनी सांगितल्या.

या ठिकाणी राहणाऱ्या अनेक कोळी कुटुंबांना भाऊंनी घर आणि मच्छीमारीसाठी लागणाऱ्या साधनांसाठी आर्थिक सहाय्य पुरविले आहे. आम्ही आल्यापासून पाच मिनिटांत लहान मुले, तरुण मुलगे, मोठे बाप्ये मिळून ३०-४० माणसे सभोवार जमली होती. लहान पोरासोरांना भाऊ आपल्या हाताने बिस्किटे देत होते. मोठ्या माणसांशी घरगुती चौकशी चालली होती आणि तरुणांना ताजी मासळी पकडण्याचे फर्मान सुटले होते. नंतर सुमारे ४०-५० मिनिटांत समुद्रात दूरवर मोठे जाळे पसरून दोन बाजूंना होडीने जाऊन अधिकाधिक मासळी जाळ्यात पकडण्याचा आणि मग ते प्रचंड जाळे अनेकांनी किनाऱ्यावरून खेचण्याचा प्रत्यक्ष प्रयोगच मला पाहावयास मिळाला. मिळालेल्या सुंदर मासळी मोटारीत पोहोचण्यापूर्वी त्याची रास्त किंमत प्रमुखाचे हाती देण्यास भाऊ विसरले नाहीत. कोणाचेही श्रम फुकटचे घेणे पाप आहे आणि अनेकांनी हे विशेष मनी बाळगले पाहिजे. अशा अर्थाचे त्यावेळी आमचे बोलणे झाले.

रात्रीचे ९॥ वाजले होते. ''चला डॉक्टर, आज संशयकल्लोळ नाटकांत जुने नट काम करणार आहेत.'' असे सांगून भाऊंनी पणजीपासून ४-८ मैल दूर असलेल्या एका गावी संशयकल्लोळ नाटकाला जाण्यासाठी मोटार बाहेर काढण्यास सांगितली. गोव्यांतील जुन्या जमान्यांतील काही प्रथितयश नट या नाटकात काम करणार होते व भाऊंना आग्रहाचे निमंत्रण होते. नाटक एका देवस्थानाच्या मदतीसाठी होते. भाऊ हजर न राहते तरच नवल!

भाऊसाहेबांचे बरोबर फिरतांना मला कोठेही खास पोलीस बंदोबस्त आढळला नाही. केव्हांही आणि कुठेही हिंडण्यास त्यांना यत्किंचितही संकोच वाटत नाही. म्हाळसा देवीच्या जत्रेत देवीसमोर वाजणाऱ्या बॅन्ड-गर्दीत घुसून जवळ उभे राहून ऐकण्यात आणि बॅन्ड प्रमुखाला अमूक गाणे वाजवा म्हणून सांगण्यात त्यांना काहीही कमीपणा वाटत नाही. ''डॉक्टर, हे कलाकार देवीसमोर आपली कला अगदी मनापासून आणि काहीही राखून न ठेवता पेश करतात'' सर्व गाणे संपेपर्यंत आम्ही हजारो लोकांच्या गर्दीत देवीच्या रथासमोर बॅन्ड ऐकत उभे होतो.

एका राज्याचा मुख्यमंत्री कोणताही खास पोलिस बंदोबस्त न घेता वेळी-अवेळी आपल्या प्रांतातील कोणत्याही भागात एकटादुकटा हिंडतो. रस्त्यात ओळखीच्या हॉटेलसमोर गाडी थांबवून चहा मागवून नोकर वर्गाची, गाडीतील पाहुण्यांची, दुपारच्या चहाची आठवण ठेवतो. भाजी, फळे, फुले विकण्यासाठी खेडूत रस्त्यावर असतात. त्यांच्याजवळ गाडी उभी करून मालाची खरेदी करतो. भाऊंची मोटार बघून 'आपलीच भाजी घ्या' म्हणून दरएक खेडूत आग्रह करतो. प्रत्येकाकडून थोडेफार घेऊन सांगितलेली किंमत, ''अरे चोरा, मला जास्त भाव सांगतोस काय?'' असे हसत हसत म्हणून त्यांच्या हाती देतो. ''इथे बसून राहू नका. तीन मैलांवर असलेल्या ....गावच्या बाजारात माल नेलात तर चांगली किंमत तुम्हाला मिळेल. तिकडे माल न्या.'' असा सल्ला त्या खेडूतांना देत, सकाळी स्नान आणि श्रद्धेने देवपूजा करून मगच दैनंदिन व्यवहार सुरू करतो. सिगार, सुपारीचेही ज्याला आकर्षण असत नाही, नाटक आणि संगीत याची ज्याला अतृप्त प्रीती आहे, व्यवहारांत कोणाचे खोटे कर्म उघडकीला आल्यास जेथे क्षमा होत नाही, गरिबांचे हाल पाहून ज्याचे मन सतत कष्टी होते, दुपारी जेवणाचे वेळी जे कोणी हजर असतील त्यांना आपल्या समवेत डायनिंग टेबलवर जेवायला बसवायला जो कधीच विसरत नाही, कमी सडीच्या तांदुळाचा भात, ताजी पालेभाजी, ताज्या मासळीचे कालवण, नारळाचे सार अशा साध्या आहारा संबंधी ज्याचा आग्रह असतो, दर्याकिनारी निवांतपणे घालविलेली पाच दहा मिनिटे असोत वा भेटीला आलेल्या परकीय पाहुण्यांशी केलेली चर्चा असो, बाजारांत वा जत्रेत गर्दीतून धक्काबुक्कीतून वाट काढतानाची वेळ असो वा खाणीवरील मालाची पाहाणी करताना असो, हॉलिडे सेंटरसाठी जागेची पहाणी असो, वा पणजींमध्ये नव्याने सुरू झालेल्या एअर कन्डिशन्ड हॉटेलच्या उद्घाटनाचा समारंभ असो; प्रत्येक क्षणी, प्रत्येक ठिकाणी भाऊ साहेबांचे मनांत आणि वाणींत एकच विचार, एकच प्रतिपादन चालू असते. ते म्हणजे गोव्याची भरभराट कशी होईल, इथल्या जनतेचे जीवनमान, राहाणी कशी सुधारेल, परकीय चलनाचा ओघ इकडे कसा वळेल, गोवा राज्याची आर्थिक आणि शैक्षणिक भरभराट कशी साधेल, येथली रोजंदारी कशी सुधारेल, येथे उद्योगधंदे कसे वाढतील, हा एकच विषय ज्याच्या विचारांचा केंद्र बिंदू बनला आहे, ज्याचा सर्वच वेळ जनतेच्या कामांसाठी आणि प्रजेची चिंता वाहण्यात व्यतीत होतो आणि सर्व दिवस कामांत व्यग्र असणारा हा मुख्यमंत्री रात्री बिछान्यावर पाठ टेकल्यावर चारपांच मिनिटांत गाढ झोपण्याइतकी निष्काळजी आणि शांत मनाने प्रसन्न असू शकतो, असे हे दयानंद बाळकृष्ण बांदोडकर. असे भाऊसाहेब बांदोडकर वयाची ६० वर्षे पूर्ण करून यापूर्वीच ६१ व्या वर्षांत पदार्पण करते झाले आहेत.

दैनंदिन जीवनांतही लोकशाही अंगी बाणलेल्या सत्यव्रत, जनहितदक्ष आणि लोकप्रिय अशा या भारतमातेच्या सुपुत्राला शतायुष्य आणि ठणठणीत आरोग्य लाभो आणि मातृभूमीची घडत आहे त्याहूनही अधिक सेवा त्यांचे हातून घडो अशी सदिच्छा आणि ईश चरणी प्रार्थना !

जय हिन्द !

**डॉ. वा. ना. बेडेकर**

(खूप जुन्या लिखाणातून)

•••

प्रगती म्हणजे सुखवाद व ध्येयवाद यांच्या युद्धात रक्तबंबाळ झालेल्या ध्येयाला मिळणारा विजय!

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

आषाढी एकादशीच्या दिवशी प्राथमिक विभागाच्या चौथीच्या विद्यार्थ्यांना वारकरी संप्रदायाची महती, तसेच विठ्ठलाची वारी कशी असते हे समजण्यासाठी विद्यार्थ्यांकडून दिंडीचे आयोजन करण्यात आले. 'समानता' हा विषय मुलांना देण्यात आला होता. विद्यार्थ्यांनी समानतेची दिंडी काढली. भेदाभेद, स्त्री-पुरुष असमानता, मुलगा-मुलगी भेद, जातीभेद, वर्ण भेद न करता प्रत्येक माणसाला समान हक्क व समान वागणूक दिली पाहिजे ह्याचे प्रबोधन केले. वारकऱ्यांच्या सहवासाचा विद्यार्थ्यांनी आनंद लुटला व आपल्यातील कलागुणांचे प्रदर्शन केले.

**पूर्व माध्यमिक शाळा शिष्यवृत्ती परीक्षा निकाल २०१४-२०१५**

परीक्षेसाठी बसलेले विद्यार्थी : १०१ उत्तीर्ण विद्यार्थी : ९१. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी : ३४

| अनु.क्र. | विद्यार्थ्यांचे नाव | शिष्यवृत्ती क्र. |
|---|---|---|
| १ | धामणस्कर शौनक पराग | ३ |
| २ | गांगल मृण्मयी सुयोग | ४ |
| ३ | फणसे ईशान अमित | ५ |
| ४ | पेठे आदिती निलेश | ८ |
| ५ | ढापरे वरदा सुजय | ९ |
| ६ | पाताडे अनया प्रशांत | ९ |
| ७ | गवस व्यंकटेश सुधीर | ११ |
| ८ | कुलकणी सारा सतीश | १२ |
| ९ | त्रिपाठी प्रत्युष सुरेश | १३ |
| १० | बाळगांवकर श्रेया संजय | १४ |
| ११ | गणू सर्वेश आशीष | १५ |
| १२ | खेडेकर मैत्रेय दिगंबर | १५ |
| १३ | जोशी राजस सतीश | १५ |
| १४ | गोरे श्रृती संदीप | १६ |
| १५ | गोरे सोहम संदीप | १८ |
| १६ | बर्वे जयंत संजय | २१ |
| १७ | नाचणकर अथर्व किरण | २१ |
| १८ | वैद्य यतिश अभिजित | २१ |
| १९ | बाबर आर्यन मच्छिंद्र | २२ |
| २० | धारप अजिंक्य मंदार | २२ |
| २१ | कर्णिक रुचिता भूषण | २२ |
| २२ | ओक गायत्री आल्हाद | २३ |
| २३ | डोळस देविका मयुरेश | २३ |
| २४ | खुटवल गौरव आनंद | २३ |
| २५ | देशमुख श्रेयस संतोष | २३ |
| २६ | दास्ताने कुश आशीष | २४ |
| २७ | वेलांगी सानिया अभिजित | २४ |
| २८ | पाठक जान्हवी रवींद्र | २४ |
| २९ | शिंदे आबोली गणेश | २६ |
| ३० | पेंडसे आर्या जयंत | २६ |
| ३१ | दिंडे ओम क्रिष्णा | २७ |
| ३२ | जोग आद्यश्री सदाशिव | २७ |
| ३३ | मिठबंदर केयूर अभय | २७ |
| ३४ | रानडे आत्मज विवेक | २९ |

### उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा २०१५ चा निकाल

परीक्षेला बसलेले विद्यार्थी : ६९

उत्तीर्ण झालेले विद्यार्थी : ६१

| क्र. | शिष्यवृत्तीधारकाचे नाव | गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | यश अजय देशपांडे | २४८ | ९ |
| २ | विश्वराज मंदार बोरकर | २४० | १३ |
| ३ | वरुण योगेंद्र गोडबोले | २३६ | १५ |
| ४ | यश संदीप कोकाणे | २३४ | १६ |
| ५ | सोहम प्रशांत सांगलीकर | २३० | १८ |
| ६ | अथर्व मदन हिरवे | २२४ | २१ |
| ७ | सोहम आशीष शिंपी | २१४ | २६ |
| ८ | प्रथमेश राजेंद्र वालावलकर | २१२ | २७ |
| ९ | मैत्रयी धनंजय कुलकर्णी | २०६ | ३० |
| १० | तेजस सचिन भाटे | २०० | ३३ |
| ११ | सरगौंदिपकौर हरदिपसिंग सचदेव | २०० | ३३ |
| १२ | रिशभ प्रकाश गोरे | २०० | ३३ |
| १३ | प्रथमेश श्रिपाद ठाकूर | १९८ | ३४ |

### संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षा २०१४-२०१५ चा निकाल

१००% निकाल : परीक्षेला बसलेले विद्यार्थी - २८

ब्राह्मण सेवा संघ आयोजित संस्कृत शिष्यवृत्ती परीक्षेतील शिष्यवृत्ती धारक विद्यार्थी.

१) दिशा चक्रवर्ती - तिसरा क्रमांक

२) अमय दानोळे - तिसरा क्रमांक

३) ऊर्वी गुप्ते - चौथा क्रमांक

४) विघ्नेश कदम - पाचवा क्रमांक

५) सचिन गुप्ते - सातवा क्रमांक

६) पालव खांडेकर - आठवा क्रमांक

### *MKCL* आयोजित *Maharashtra Olympiad Movement* चा निकाल : १००%

कु. शांभवी जोशी व कु. विश्वराज बोरकर ह्यांनी जिल्ह्यात ३ रा क्रमांक पटकावला.

### फेब्रु. २०१५ - टिळक विद्यापीठ गणित परीक्षेचा निकाल : १००%

| इ. | परीक्षेला बसलेले विद्यार्थी | प्राविण्यासह उत्तीर्ण | प्रथम श्रेणीसह उत्तीर्ण | द्वितीय श्रेणीसह उत्तीर्ण | तृतीय श्रेणीसह उत्तीर्ण |
|---|---|---|---|---|---|
| ५वी | ११ | ३ | ८ | - | - |
| ६वी | १२ | ८ | ४ | - | - |
| ७वी | ०७ | ३ | ४ | - | - |

### सर्वाधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची नावे :

| इ. | नाव | गुण |
|---|---|---|
| ५ वी | मैथिली बापट | ९४ |
| ६ वी | ईशान मलिये | ९५ |
| ७ वी | निशिता फडके | ९३ |

### वाडिया कॉलेज पुणे आयोजित एप्रिल २०१५ महाराष्ट्र प्रज्ञा शोधचा निकाल :

१) कु. शांभवी जोशी हिने ठाणे जिल्ह्यात १ ला क्रमांक पटकावला.

२) कु. गायत्री पाटील आणि कु. शुभम पट्टेकरने ठाणे जिल्ह्यात अनुक्रमे २ रा व ३ रा क्रमांक पटकावला.

३) कु. निहार बाम व कु. आदित्य जोशी यांना प्रशिस्तीपत्रके मिळाली.

---

ईश्वर गरीब मनुष्याला गरीब ठेवून त्याच्यात हिम्मत आहे की नाही ह्याची कसोटी घेत असतो. - विनोबा भावे.

## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### शिकवणीस आरंभ

एप्रिल-मे मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे द्वितीय व तृतीय विधी वर्गाची शिकवणी १ जुलै २०१५ पासून सुरू करण्यात आली. निकाल लागण्यापूर्वी सदर वर्ग सुरू करण्यात आले होते. प्रभारी प्राचार्या, पूर्ण वेळ व अर्धवेळ प्राध्यापक यांना सदर पदभार देण्यात आला.

निकालानंतर द्वितीय विधीचे प्रवेश झाले व २० जुलै पासून नियमित वेळापत्रक सुरू रण्यात आले. सध्या तृतीय विधीचे प्रवेश सुरू आहेत व दिनांक ३ ऑगस्टपासून नियमित वर्ग सुरू झाले.

### मुंबई विद्यापिठाचा २०१५ चा निकाल

| क्रमांक | महाविद्यालय | विद्यापीठ | प्रथम श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | ३७.०९% | ३५.२७% | ०५ |
| २ | ६०.६६% | ५१.५५% | ०३ |
| ३ | ६२.८७% | ५६% | ०४ |

### २०१४-२०१५ मधील यशस्वी विद्यार्थी

१) कामगार कायदा - मार्कडेय अनुप्रिता शिवदास के - ११५०७८-६४
२) संविधान कायदा - शेणॉय दिशा दीपक विनिता - १७३६३-६५
३) पुरावा कायदा - शशाने विजयकुमार शानाराम - ३१९४० -६३

### प्राचार्यांची बैठक

माननीय कुलगुरू यांनी दिनांक ४ जुलै २०१५ ला सि. के. टी. महाविद्यालय येथे ठाणे व कल्याण येथील प्राचार्यांची बैठक बोलाविली होती. माननीय कुलगुरू यांनी यावेळी सांगितले की, 'सर्वांनी एकत्र येवून व एकमेकांच्या सहकार्यानेच आपल्या समस्या सोडविल्या पाहिजेत. विद्यार्थी जेव्हा प्रगत व आनंदी होतील तेव्हाच आपण विजयी होऊ' असे ते म्हणाले. माननीय कुलगुरू यांनी विधी महाविद्यालयातील प्राचार्यांची वेगळी सभा होईल असे आश्वासन दिले.

### प्रथम विधी प्रवेश

बी. ए., बी. कॉम., व बी. एस्स. सी. चा निकाल घोषित करण्यामागे होणाऱ्या दिरंगाईमुळे प्रथम विधीचे प्रवेश अजून सुरू झालेले नाहीत.

### मुंबई विद्यापीठाचा १५९ वा स्थापना दिवस

दिनांक १७ जुलैला मुंबई विद्यापीठाने विद्यापीठाच्या पदवीदान सभागृहामध्ये १५९ वा स्थापना दिवस साजरा केला. माननीय कुलगुरू च्या हस्ते विद्यार्थी कर्मचारी वर्ग यांच्या गुणाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या यांनी सदर कार्यक्रमात भाग घेतला.

### ग्रंथालय

भारतीय अधिवक्ता मंडळाच्या नियमाप्रमाणे महाविद्यालय Indian Bar Review चे १० अंकांचे वर्गणीदार झाले. सदर अंक हा त्रैमासिक असून याचे अगोदरचे नाव हे Journal of Bar Council of India असे होते.

### द्वितीय व तृतीय विधी प्रवेश

द्वितीय व तृतीय विधीची प्रवेश प्रक्रिया संपन्न झाली. प्रोविजनल प्रवेश हा ऑगस्टमध्ये देण्यात येईल.

## तंत्रनिकेतन

### अक्षय ऊर्जा दिवस उत्साहात साजरा

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन, ठाणे येथील इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टीमच्या विभागातर्फे अक्षय ऊर्जा दिवस दि. १ ऑगस्ट २०१५ रोजी उत्साहात साजरा करण्यात आला.

या दिवसाचे औचित्य साधून इन्स्टिट्यूट पातळीवर पेपर प्रेझेंटेशनचे आयोजन करण्यात आले होते. अक्षय ऊर्जेसंबंधीची माहिती उपस्थितांना मिळाली. विद्यार्थी व शिक्षक या कार्यक्रमाला उपस्थित होते.

### 'गुरुपौर्णिमा' उत्साहात साजरी

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागातर्फे दि. ३१.०७.२०१५ रोजी 'गुरुपौर्णिमा' उत्साहात साजरी करण्यात आली.

दरम्यान दुपारी १२ वाजल्यापासून ५ वाजेपर्यंत प्रकल्प प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यात एकूण २३ विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प सादर केले होते. एक महिन्यापासून चालत आलेले 'Arducno Workshop' या नव्या तंत्रज्ञानाच्या प्रशिक्षणानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पनाशक्ती व सृजनशीलतेचा वापर करून नवनवीन असे इलेक्ट्रॉनिक्स प्रकल्प तयार केले होते. Water level controller, Capacitive type pieno, Real time clock, Temperature controller इत्यादी प्रकल्पाचा समावेश होता. सदरचे प्रकल्प प्रदर्शनाचा सर्व विभागातील विद्यार्थ्यांनी लाभ घेतला. प्रा. कीर्ती आगाशे, डॉ. संगिता जोशी, शिरिष काळे व लिकोन सर यांनी सदर प्रकल्पाचे परीक्षण केले.

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या दुःखद निधनाबद्दल आदरांजली अर्पण करून सायंकाळी ५.०० वाजता कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रा. कीर्ती आगाशे यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगितले. डॉ. संगिता जोशी यांनी विद्यार्थ्यांच्या गुणाचे कौतुक करून इंग्रजी संभाषणात उत्कृष्टता प्राप्त करावी असा मोलाचा उपदेश केला. यानंतर भारतीय संस्कृतीद गुरूचे महत्त्व अंजलीने व्यक्त केले.

तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी एकांकिका सादर केली. त्यानंतर त्यांनी समुहगीत सादर केले. 'खेळ मांडला' या 'नटरंग' मराठी सिनेमातील गीत सादर केले. वैभवी मीठभाकरे व प्रियांका अहिरे या विद्यार्थिनींनी 'इवले-इवले' हे गीत शास्त्रशुद्ध पद्धतीने सादर केले.

वैभव क्षीरसागर या विद्यार्थ्याने मनाच्या एकाग्रतेवर आत्मसमर्पण व विद्याग्रहण करण्याचा उपदेश यावर झालेला श्रीकृष्ण-अर्जुन यांच्यातील संवाद सादरकेला.

एक गुरू विद्यार्थ्यांच्या जीवनात कसा बदल घडवून आणतो यावर TYIE च्या विद्यार्थ्यांनी एकांकिका सादर केली.

यानंतर अडिनो एक्झिबिशनचे सर्वोत्तम प्रकल्प ठरलेल्या प्रकल्पांना पारितोषक व प्रशस्तीपत्रके देण्यात आली.

प्रा. कीर्ती अगाशे यांनी गुरू वर गीत सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोहम कुलकर्णी याने केले.

### पारदर्शकता सर्वांसाठी

'पारदर्शकता' केवळ कनिष्ठांसाठीच असेल, तर मग संशयाचे वातावरण निर्माण होऊ शकते. तर वरिष्ठ हुकूमशहाच्या भूमिकेत राहू शकतात. चांगल्या उत्पादनशील कार्यसंस्कृतीसाठी कंपनीत सर्वात वरिष्ठ पदापासून ते सर्वात कनिष्ठ पदापर्यंत सर्वांसाठी 'पारदर्शकता' ही अनिवार्य असावी लागते. यामुळे एकत्रितपणाची भावना वाढत जाते व सलोख्याचे संबंध प्रस्थापित होतात; ज्याचा उत्पादकतेवर चांगला परिणाम होतो. श्रेणीनुसार पदाधिकाऱ्यांचा मान राखत मुख्य वरिष्ठांनी सर्व कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असणेसुद्धा विश्वासाचे वातावरण दृढ करते. व्यवस्थापक, अधिकारी व कर्मचारी यांना केवळ साचेबद्ध जबाबदारी न देता, त्यांच्या कल्पकतेला वाव देत व वास्तविकतेला पारखत त्यांच्या सुचनेनुसार जबाबदारी दिली जाते तेव्हा खरी पारदर्शकता अस्तित्वात येते. अशा वातावरणात स्वतःच्या सूचना अंमलात आणताना कर्मचारी स्वतःला झोकून देतात.

(पृष्ठ २ वरून - **संपादकीय**)

४३ वर्षांचा सुंदर पिचाई हा भारतीय वंशाचा नागरिक गुगुलसारख्या महाकाय संस्थेचा प्रमुख होऊ शकतो. आर्थिक संस्था असोत किंवा संशोधन संस्था. 'खुल्या' स्पर्धेच्या वातावरणातच त्यांचा विकास होऊ शकतो. लंडन सिटी कॉर्पोरेशनचे प्रमुख मार्क बोलिएट (MARK BOLEAT) यांनी बिझनेस स्टँडर्डला मुलाखत देतानाही हाच मुद्दा आग्रहाने मांडला. (शुक्रवार, २८ ऑगस्ट २०१५. पृ.४)

I cannot advise what India needs to do. What I can say is that for an International finance centre. Being open and international to the rest of the world is critical... To be a global financial hub, you have to be completely open. In Britain, we do not consider where institutions come from.

१९०० ते २००० पर्यंतच्या १०० वर्षांत सुमारे ५३२ नोबेल पारितोषिकांपैकी २३५ अमेरिकन विद्यापीठांमधील संशोधकांनी मिळवली. या कालावधीत डॉ. सी. व्ही. रमन या एकाच भारतीय शास्त्रज्ञाला पदार्थविज्ञानात १९३० साली नोबेल पारितोषिक मिळाले. हर गोविंद खुराना - १९६८, सुब्रह्मण्यम चंद्रशेखर - १९८३ आणि व्यंकटरामन रामकृष्णन-२००९ या भारतीय वंशाच्या संशोधकांना नोबेल पारितोषिकं मिळाली असली, तरी त्यांचे सर्व संशोधन हे अमेरिकेतील विद्यापीठांतूनच झाले. हिच गोष्ट पेटंटसूच्या बाबतीतही आहे. अमेरिकन विद्यापीठे आणि त्यांच्या संशोधकांकडे आज हजारोंनी पेटंटस् आहेत. याबाबतीत भारतीय विद्यापीठांमधील पेटंटसूची संख्या क्षुल्लक आहे.

१९४०च्या सुमारालाच भारतामध्ये दर्जेदार संशोधन संस्थांच्या निर्मितीला सुरुवात झाली होती. १९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले, आणि पुढेही १५-२० वर्ष ही प्रक्रिया चालूच राहिली. BARC, TIFR, IITs, IIMs या जागतिक दर्जाच्या संस्था याचकाळात निर्माण झाल्या. या सगळ्याच संस्थांना सरकारी मदत होती, पण त्यामध्ये राजकीय हस्तक्षेप नव्हता. या संस्थांची निर्मिती करणारेही 'अव्वल' दर्जाचे 'शास्त्रज्ञ' होते.

डॉ. होमी भाभांनी TIFR, BARC या संस्थांची निर्मिती केली. पॉल डिरॅक (Paul Dirac) या संशोधकाच्या मार्गदर्शनाखाली डॉ. भाभा हे केंब्रिज विद्यापिठात शिकले. दुसरे महत्त्वाचे संशोधक म्हणजे शांती भटनागर. त्यांनी लंडन विद्यापीठामध्ये रसायनशास्त्रामध्ये संशोधन केले. Council of Scientific and Industrial Research या भारतीय संशोधन संस्थेचे ते प्रमुख होते. भारताला नॉर्वेकडून heavy water मिळवून देण्याकरता झालेल्या चर्चेमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता, तर डॉ. भाभा हे ओटावा येथे भारताला रिॲक्टर मिळावा म्हणून वाटाघाटी करत होते. प्रशांत महालानोबिस हे केंब्रिज विद्यापीठात प्रशिक्षण घेतलेले आणखीन एक पदार्थविज्ञानातील संशोधक. जागतिक तोडीची 'आकडेशास्त्रीय संस्था' त्यांनी कलकत्ता येथे स्थापन केली. श्रीयुत कोठारी यांनीसुद्धा पदार्थ विज्ञानात केंब्रिज येथूनच पदवी प्राप्त केली होती. १९४८ साली रक्षामंत्रालयात त्यांची सल्लागार म्हणून नेमणूक झाली. १९४९ साली स्थापन झालेल्या Defence Science Organization चे प्रमुखपद त्यांना देण्यात आले. १९६४ साली भारतातील शिक्षण व्यवस्थेचा अभ्यास करण्याकरता एक समिती नेमण्यात आली. त्याचे कार्याध्यक्षपद कोठारी यांना देण्यात आले. १९६६ साली त्यांनी शिक्षणाच्या संदर्भात मार्गदर्शन करणारा अहवाल सरकारला सादर केला. आजची आपली सर्व महाविद्यालयीन शैक्षणिक रचना ही या कोठारी समितीच्या अहवालाप्रमाणेच कार्यरत आहे.

डॉ. भाभा, डॉ. भटनागर, डॉ. महालानोबिस आणि डॉ. कोठारी हे सर्वच तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या विश्वासातील होते. विज्ञान, तंत्रज्ञान आणि औद्योगीकरण व त्यातून भारताची आर्थिक उन्नती, याकरता हे सगळे शास्त्रज्ञ कटीबद्ध होते. डॉ. साहा आणि डॉ. साराभाईंसारखे संशोधकही पुढे या राष्ट्रनिर्मितीच्या संकल्पनेमध्ये सामिल होते. डॉ. भाभा आणि डॉ. भटनागर यांच्या नावाची शिफारस नोबेल पारितोषिकाकरताही झाली होती.

भारतामध्ये बुद्धीमान आणि कार्यकुशल व्यक्तिंची कमतरता आधीही कधी नव्हती, आणि आजही नाही. मी कोण? कुठून आलो? सृष्टीची निर्मिती आणि मानव यांच्यातील परस्परसंबंध, याची अत्यंत तात्विक आणि

चिंतनशील चर्चा उपनिषदांमधून केली गेली आहे. २०व्या शतकात पदार्थविज्ञानामध्ये क्रांतीकारक संशोधन केलेल्या नील्स बोर (Niels Bohr), हायजेन्बर्ग (Heisenberg), एर्विन श्रोडिंगर (Erwin Schrodinger) आणि जे. रॉबर्ट ऑपेनहायमर (J. Robert Oppenheimer) या सगळ्यांनाच उपनिषदातील विचार, आणि आधुनिक विज्ञानातील काही सिद्धान्त यांच्या विचारप्रक्रियेतील साधर्म्याने स्तंभित केले होते. श्रोडिंगर यांची My view of the world आणि Mind and Matter ही पुस्तके याकरता प्रत्येक भारतीयाने वाचली पाहिजेत.

५व्या शतकातल्या आर्यभटापासून २०व्या शतकातील रामानुजम पर्यंत भारताची गणिताची परंपरा ही भारतीयांच्या सृजनशीलतेबद्दल खूप काही सांगून जाते. आदर आणि अभिमान बाळगावा अशी ही भारतीय संस्कृतीची शिल्पे आहेत. पण सगळ्या समाजाला वेठीस धरून रस्त्यावर साजरी करणाऱ्या दहीहंडी किंवा गणेश उत्सवाला आपली संस्कृती मानणाऱ्यांना हे कोण समजावून सांगणार? भारतीय विद्यापीठे आणि त्यामधील संशोधकांना जागतिक दर्जा मिळवायचा असेल, तर राजकीय हस्तक्षेपाला यामधून हद्दपार करावे लागेल. गोलमेज परिषदा घेऊन संशोधनाचा दर्जा सुधारता येत नाही.

सप्टेंबरमध्ये आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सिलिकॉन व्हॅलीमधील भारतीयांना उद्देशून भाषण करणार आहेत. या संदर्भात सोमवार, ३१ ऑगस्ट च्या Times of India मधील अग्रलेखातील टिपण बोलके आहे.

Opennness is the one word which encapsulates the essence of Silicon Valley. It stems from the belief that nothing is pre-ordained and collaboration is the path of success. Building on that idea Standford University, which is Silicon Valley's epicentre, not only collaborated with industry but also gave birth to iconic technology companies. A lesson for India is that micromanagement is a sure way of inhibiting the potential of higher education. An extensive system of political and bureaucratic control kills initiative in any area.

नावीन्य किंवा शोध हे क्वचितच अपघाताने लागतात. साधनांच्या उपलब्धतेप्रमाणेच संशोधक वृत्तीची 'मशागत' आणि 'जोपासना' करायला लागते. संशोधनाकरता तर्कबुद्धीची (Logical, Rational) जेवढी गरज असते, तेवढीच अंतःप्रज्ञेचीही (Intuiation) त्याला मदत असते. तर्कप्रज्ञा आणि अंतःप्रज्ञा या एकमेकांच्या विरोधात नसून संशोधनाकरता त्या एकमेकांना पूरक असाव्या लागतात. शिक्षण, मार्गदर्शन आणि चर्चेच्या माध्यमातूनच या मानसिकतेला दिशा मिळत असते. सिद्धान्तवाद किंवा कुठलीही नियंत्रणं हा या प्रवासातला मोठा अडथळा असतो. संशोधन स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नाही.

अहंकार आणि श्रेष्ठत्वाच्या भावनेनी बाधित झालेला संस्कृतीवाद, किंवा फाजील भाषा आणि प्रांतीयवाद, फक्त फोल भावनांचा उद्रेक निर्माण करतो. यातूनच निर्बुद्ध आणि भ्रष्ट संत, महंत, गुरू आणि नेते उदयाला येतात. तेवढेच भ्रष्ट आणि स्वार्थी अनुयायी आणि कार्यकर्त्यांची एक फौजच यातून तयार होते. व्यक्तिगत, आणि सामूहिक 'विवेक' यामुळे दुर्मीळ होऊन गुन्हेगारी आणि रस्त्यावरील धटींगणगिरीलाच ''पुरुषार्थ'' म्हणून समजण्यात येऊ लागते. यामुळेच सांस्कृतिक सणांचे विकृतीकरण होते. संवेदनाशून्य आणि बधिर अशा या समुहांकडून बहुसंख्य शांतताप्रिय समाजाच्या सहनशीलतेचा अंत बघितला जातो. संशोधनाकरता हवे असणारे 'स्वातंत्र्य' आणि 'विवेक' अशा समाजाकडून कधीच निर्माण होत नाही.

आपल्या सृजनतेला संधी मिळवण्याकरता फारच थोडे लोक देशांतर करू शकतात. दुर्दैवाने बाकीच्यांवर मात्र पाळी असते, म्हणण्याची , ''येरे येरे पावसा, तुला देतो पैसा, पैसा झाला खोटा, पावसा आला मोठा.''

**डॉ. विजय बेडेकर**

●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.